. ग्रं. सं. ठाणें
का/२१
७२०

# यशवंती.

## पुस्तक पहिलें.

REFBK-0001987
REFBK-0001987

किंमत १० आणे.

# आळीमिळी

( शार्दूलविक्रीडित )

माझ्या चित्तसरांवरीं उसळती
लाटा कशाच्या तरी,
दावाया वदुनी रहस्य नव तें
जिव्हा स्फुरे नाचरी;
तों कोणी मजला त्वरें खुणवुनी
आळीमिळी घातली,
माझी उत्सुकता अशी विरमली
चित्तांत चितांतली.

REFBK-0001987
REFBK-0001987

यशवंत

# प्रकाशकाचे चार शब्द.

महाराष्ट्रांतील बहुतेक विद्यमान मासिकांच्या वाचकांना कवि 'यशवंत' यांचा परिचय करून देण्याचें कारण नाहीं. मित्रास्तानंतरच्या नैराश्यांधकारांत 'मित्रप्रेमरहस्याची मशाल घेऊन चाचपडतांना वाचकांच्या सस्नेह सहानुभूती-मुळें उदास समाधान मानूं लागलेली 'यशवंती' पहिल्या बुजगावणीची भीति भीतभीतच बाजूला सारून आज आपणांपुढें येण्याचें धाडस करीत आहे.

आजचा दिवस—'यशवंती'वर पोरकेपणाचा प्रहार करणारा आजचा दुर्दैवी दिवस—पहिल्या अमानुषपणानें आज तीन वर्षांपूर्वीच्या शरदृतूंतच येऊन गेला. परंतु तितक्याच जळजळीतपणानें आजही तो 'यशवंती'ला आणवत आहे, किंबहुना प्रत्येक दिवस त्याच दिवसाचें भेसूर रूप घेऊन तिच्या-पुढें आपला असुरी थयथयाट अघुरी आनंदानें घालीत आहे. परंतु काळाच्या भेडसावणीला भीक न घालतां ती बिचारी दुःखभरानें त्या मनोमय समाधीला प्रदक्षिणा घालण्यांतच गर्क झाली आहे. आणि म्हणूनच तिच्या वतीनें मला जें कृतज्ञतेचें कार्य करावयाचें आहे तें हेंच कीं, ज्या स्नेह्यांच्या तत्पर सहाय्यानें हें कार्य इतक्या अल्पावधींत पूर्ण झालें त्या सर्वांचें आभार मानणें हें होय. परंतु साहाय्यकांच्या उपकारांतून उतराई होण्यांत कवीला आनंद वाटत नाहीं. आभारप्रदर्शनानें उपकारमुक्तता होतच नाहीं; आणि जरी मुक्तता होतें असें धरून चाललें तरी 'कामापुरता मामा' असल्या देवघेवीचा संबंधविहीन सडेतोडपणा पत्करून त्यांच्या निरपेक्ष आपलेपणाला दुखविण्याची निष्ठुरता कवीच्या हातून होणार नाहीं. असले पवित्र व मनोहर ऋणानुबंध असेच अनु-च्चारित राहण्यांतच मनोरम रहस्य नसतें काय ?

प्रस्तावनालेखक श्री. गोपाळराव ऊर्फ आण्णासाहेब मुजुमदार यांनीं आपलेपणानें पत्करलेल्या परिश्रमांबद्दल त्यांचे आभार—पण मुलगी सुखानें नांदूं लागली म्हणजे त्यांच्या परिश्रमांचा त्यांना मोबदला मिळाल्यासारखा होई-लच ! मी तोकड्या शब्दांनीं त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं उगीच उष्पा मारून कशाला हंसें करून घेऊं ?

प्रस्तुत पुस्तकांतील पहिली व शेवटच्या दोन कवितांखेरीज बाकीच्या कविता कालानुक्रमानें संग्रहित केल्या आहेत. १९१९च्या आगष्टपासून १९२१ च्या आगष्टपर्यंतच्या कविता या भागांत आल्या आहेत. पुष्कळ प्रकाशित प्रकरणें चांगलीं असूनही तीं प्रासंगिक होतीं म्हणून या पुस्तकांत घेतलीं नाहींत. ही कवितांची निवड माझ्या अभिरुचीप्रमाणें मीं केली आहे; त्यामुळें कांहीं चांगली प्रकरणें चुकून अप्रकाशित राहिलीं असल्यास आणि कांहीं नीरस प्रकरणें ( अर्थात् वाचकाच्या दृष्टीनें ) या संग्रहांत आलीं असल्यास त्याबद्दल सर्वस्वीं मी जबाबदार आहें.

मुद्रकांनीं हें कार्य केवळ ८–१० दिवसांत तयार करुन दिलें याबद्दल त्यांचे आभार मानावेत तितके थोडेच आहेत.

श्री अंबिकाभुवन, बाफळ<br>आश्विन शुद्ध १, शके १८४३

आपणा सर्वांचा नम्र<br>वि. दि. पें.

ता. क०—पृष्ठ ५७ वरील 'देहाचा पूल' या कवितेला, एप्रिल१९२१ मध्यें कोल्हापुरास झालेल्या कविसंमेलनांत रौप्यपदक मिळालें आहे !

# अनुक्रमणिका.



| विषय | पृष्ठ | रचनाकाल | प्रसिद्धीसाधन |
|---|---|---|---|
| आळांमिळी. | १ | ... ... | ... ... |
| प्रकाशकाचे चार शब्द | ३ | ... ... | ... ... |
| प्रस्तावना. | १ | ... ... | ... ... |
| यशवंती. | ५ | ३-८-१९२१ | ... ... |
| शिशुचुंबन. | ६ | आगष्ट १९१९ | नवयुग व वि. विस्तार |
| पार्वतीबाईची निराशा | ७ | २७-८-१९१९ | विविधज्ञानविस्तार. |
| चातकाशीं संवाद. | १० | ११-९-१९१९ | नवयुग |
| रिपु साचे मानवतेचे | १२ | २२ ९-१९१९ | उद्यान |
| जलदुर्ग आणि तारा | १३ | ६-१२-१९१९ | विविधज्ञानविस्तार |
| संभाजीचा पश्चात्ताप. | १७ | २३-१-१९२० | उष:काल-माला |
| मधुकराचें आत्मनिवेदन | १८ | २७-१-१९२० | ... ... |
| नाद-नटी. | २० | १५-२-१९२० | ... ... |
| काव्यानंद. | २१ | १८-२-१२९० | विविधज्ञानविस्तार |
| गुढी पाडवा. | २२ | ४—३-१९२० | कीर्तन व भाग्योदय |
| कुंची. | २३ | १९-३-१९२० | उदय |
| तो कर्मयोगी. | २४ | ३—६-१९२० | कर्मयोगी |
| वेड्याचें आत्मवृत्त. | २५ | जून १९२० | ... ... |
| अजिंक्यतारा पाहून | २७ | ,, | भाग्योदय |
| दुरुपयोग. | २७ | २२-६-१९२० | विविधज्ञानविस्तार |
| वेलीच्या नव अंकुरा ! | २९ | १६-७-१९२० | चित्तमयजगत् |
| बालार्का ! | ३० | २६-७-१९२० | मराठा शिक्षक |
| निर्झरिणी | ३१ | २७-७-१९२० | ... ... |
| मारुं नकोग ! | ३२ | ६—८-१९२० | मराठी शिक्षक |
| मारूं नको ग ! | ३४ | ६—८-१९२० | मराठी शिक्षक |

| विषय | पृष्ठ | रचनाकाल | प्रसिद्धीसाधन |
|---|---|---|---|
| स्मशानांतील गुणगुण | ३५ | १३-८-१९२० | लोकसंग्रह |
| सागराचें उचंबळणें | ३६ | २५-८-१९२० | भाग्योदय |
| शिवनेरी. | ३७ | २७-९-१९२० | उद्यान |
| दूषित दृष्टि. | ३७ | १७-१०-१९२० | ... ... |
| शिलंगण. | ३८ | २२-१०-१९२० | ... ... |
| स्वर्गीय संजीवनी. | ३८ | २३-११-१९२० | ... ... |
| बाललीला. | ४० | २४-११-१९२० | ... ... |
| मी केवळ तुमचें वारें. | ४१ | १-१-१९२१ | ... ... |
| संक्रांतीचा हलवा | ४१ | जानेवारी १९२१ | ... ... |
| दैवाचा भेसूर खेळ. | ४२ | २९-१-१९२१ | गोरक्षण |
| हे हनुमंता ! | ४८ | ७-२-१९२१ | ... ... |
| कृष्णकुमारीचा आत्मयज्ञ | ५० | १५-२-१९२१ | ... ... |
| हे प्रतिमे ! | ५४ | ६-३-१९२१ | ... ... |
| देहाचा पूल | ५७ | ३-४-१९२१ | ... ... |
| ऐशी कां रुपसी ? | ६० | २-६-१९२१ | ... ... |
| जगदीशा आतां धांव ! | ६१ | १२-६-१९२१ | ... ... |
| प्रभातसमयीं. | ६२ | २१-६-१९२१ | ... ... |
| बा स्वारा ! | ६४ | १-७-१९२१ | ... ... |
| इंदु. | ६६ | १४-७-१९२१ | ... ... |
| मीलन. | ६७ | १६-७-१९२१ | ... ... |
| गुरुदक्षिणा. | ६७ | १-४-१९२० | विविधज्ञानविस्तार |
| नको अंत पाहूं देवा. | ६९ | २५-११-१९२० | चित्रमयजगत |

# प्रस्तावना.

यशवंत कवींनीं आपल्या " यशवंती " ला प्रस्तावना लिहिण्याचा मान प्रस्तुत लेखकास देऊन एक प्रकारें प्रस्तुत लेखकाचा गौरव केला आहे. खरें पाहिलें असतां या मानाला पात्र असे अनेक मोठमोठे कवि महाराष्ट्रांत आहेत. पण त्या सर्वांना वगळून प्रस्तुत लेखकाकडेच ही कामगिरी सोंपविण्याचें कारण कवीच्या लहरीशिवाय दुसरें कांहीं दिसत नाहीं. कविलोक हे काव्यसृष्टींतले सुलतान असतात आणि त्यांच्या सृष्टींतले बरेचसे न्याय जरी मर्त्यसृष्टींतील न्यायाहून भिन्न असले तरी एक न्याय मात्र या दोन्ही सृष्टींत साधारण दिसतो. तो हाच कीं, या सुलतानांच्या राज्यांतील मानाच्या जागा पात्रापात्रविचार बाजूस राहून प्रायः वशिल्याच्या मंडळीला मिळतात. प्रस्तुत बाबतींत कांहीं अंशीं तसाच प्रकार झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

" यशवंत " कवींचा परिचय महाराष्ट्राशीं आतां बराच झाला आहे. विशेषेंकरून गेल्या तीन चार वर्षांत त्यांनीं काव्यरचनेंत फारच तडफेची प्रगति केली आहे. तोंपर्यंत त्यांचें शिक्षण चालू होतें, त्यामुळें त्यांच्या प्रतिभेस प्रकट होण्यास अवकाशच मिळाला नव्हता हें एक, व काव्यरचनेपूर्वी सृष्टिनिरीक्षणांत थोडा काळ घालविणें अवश्य असतें हें दुसरें; अशा दोन कारणांनीं त्यांच्या हातून अध्ययनकालीं विशेष काव्यरचना झालेली दिसत नाहीं. त्यानंतर म्हणजे गेल्या चारपांच वर्षांत त्यांच्या प्रतिभेनें अनेक विषयांना नटवून सोडलें आहे व त्यांतीलच कांहीं वेंचक विषयांची माला ही " यशवंती " च्या रूपानें आज वाचकांच्या पुढें येत आहे.

प्रस्तावनालेखकाचें काम हें एका दृष्टीनें विवाह जमविण्याच्या उपाध्यायाच्या किंवा मध्यस्थाच्या कामासारखेंच आहे. चार दोन मुलींचीं लग्नें करून सरावीत झालेल्या बापाला मध्यस्थाची जरूर लागत नाहीं. पण आपल्या कवितारूपी कन्येचा विवाह करण्याचा ज्याला प्रथमच प्रसंग आहे अशा " कविपित्या "ला अशा मध्यस्थाची जरूर विशेषच भासते. त्यांतून ज्या रसिकजनरूपी पतीच्या हवालीं ही कन्या करावयाची तो पति तर पूर्वीच्या मोगलबादशहाप्रमाणें बहुपत्नीक व विलासी असावयाचा! तेव्हां त्याच्या जनानखान्यांत

असणाऱ्या शेंकडों "पऱ्यां"पेक्षां ही कन्या त्याला अधिक आकर्षक वाटली तरच तो हिला हातीं धरणार हें उघड आहे. तशांत ती कन्या जर का अमळ " साधारणच " असली तर मग त्या मध्यस्थाची त्रेधा पुसूंच नये ! त्याच्या अंगीं " मध्यस्थाची खरी कुशलता " असली तरीसुद्धां तो या जबाबदारींतून सुरक्षित निसटून जाणें मुष्किलीचें होतें !

पण तेंच जर का आपलें " सणंग " चांगलें असेल तर त्या मध्यस्था-सारखा भाग्यवान् कोणीच नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. आणि आमच्या " यशवंती "च्या बाबतींत सुदैवानें प्रस्तुत लेखकाला तोच फायदा मिळाला आहे. यशवंत कवीची " यशवंती " " सरसालंकृति रूचिरा रसभाववती जगन्मनो हरती " असें अभिमानपूर्वक म्हणून आपल्या पक्षाची आपणच पाठ थोपटणें हें जरी एकंदरीनें गौण आहे तरी कविकन्येच्या " जन्माच्या कल्या-णाचा " प्रसंग ज्या ठिकाणीं आहे अशा ठिकाणीं तिच्यातर्फेनें एखाददुसरा स्तुतिपर शब्द बोलणें हें अगदींच अप्रासंगिक होईल असें नाहीं. त्यांतून वर गर्भित केल्याप्रमाणें यशवंतकवीची ही कन्या खरोखरीच जनमनोहारिणि अस-ल्यामुळें तर त्या दोषाचा संपर्क प्रस्तुत लेखकास मुळींच होण्याजोगा नाहीं.

कविता किंवा काव्य म्हणजे काय याची व्याख्या आजपर्यंत पुष्कळांनीं पुष्कळ प्रकारें केली आहे. पण काव्याच्या सर्व लक्षणांना सर्वथा पुरी पडणारी अशी समर्पक व्याख्या त्या शब्दाची अद्याप कोणालाही करितां आली नाहीं व पुढें कधींकाळीं करितां येईल असेंही वाटत नाहीं. या बाबतींत काव्याचें ब्रह्माशीं तंतोतंत साम्य आहे. ब्रह्म असें आहे असें निश्चित सांगतां आलें नाहीं तरी असें नाहीं हें श्रुतींना सांगतां आलें, त्याचप्रमाणें अमुक उताऱ्यांत काव्य कोणतें आहे हें जरी निश्चित सांगतां आलें नाहीं, तरी त्या उताऱ्यांतील अमुक मज-कुरांत काव्य नाहीं हें रसिकांना सहज समजतें. या बाबतींत सहृदयता एवढी साधनसंपत्ति रसिकास पुरेशी असते. तिच्या जोरावर कोणत्याही कवीची चांगली कविता—मग ती "द्राक्षपाकात्मक" असो किंवा "नारिकेलपाकात्मक" असो,—त्याला रंजविणारी होईल यांत शंका नाहीं. आणि म्हणूनच 'यशवंती'—मधील विशेष बहारीच्या स्थळांचें दिग्दर्शन करण्याच्या भरीस प्रस्तुत लेखक पडत नाहीं तशीच कोणाची अपेक्षा असल्यास, वेदान्त्याकडून ब्रह्मजिज्ञासूला मिळणारें उत्तर " कसें बोटानें दाखवूं तुला ॥ घे अनुभव गुरुत्वयः मुला ॥ "

हेंच उत्तर फारतर लोण्याच्या गोळ्याप्रमाणें प्रस्तुत लेखकाकडून त्याच्या तोंडावर टाकण्यांत येईल !

पुष्कळ वेळां अशी मौज दृष्टीस पडते कीं, दोन प्रसिद्ध रसिकांचा अनुभव अत्यंत परस्परविरोधी येतो. एकाला जें काव्य अत्यंत हृदयंगम वाटतें तेंच दुसऱ्याला अत्यंत नीरस असतें. या विसदृशत्वाची उपपत्ति "भिन्नरुचिर्हि लोकाः" या कालिदासीय न्यायाखेरीज अन्य साधनानें करितांच येणार नाहीं. अलीकडे पाश्चात्यांच्या आचारविचारांची छाप आमच्या कविमंडळीवरही पडल्यामुळें कवितेच्या राज्यांतही दोन संप्रदाय निर्माण झाले आहेत. पहिला जो हिंदुसंस्कृतीचा संप्रदाय त्याची दृष्टि जगाकडे अद्वैत दृष्टीनें पाहाण्याची, सृष्टीला तो मिथ्या मानून चालणार, आणि परमेश्वराशीं आपण एकरूप आहोंत असें मानून त्याजबरोबर लगट करणार ! या संप्रदायांतील कविता प्रायः भक्तिरसप्रधान, अद्वैतप्रतिपादक, सृष्टीकडे तुच्छ दृष्टीनें पाहणारी अशी असणार हें उघड आहे. दुसरा पाश्चात्य संस्कृतीचा संप्रदाय ! हा सृष्टीकडे सत्य दृष्टीनें पाहणारा, द्वैतमताभिमानी आणि परमेश्वरापुढें अत्यंत भीडस्तपणानें वागणारा असा आहे. या संप्रदायांतील कविता प्रायः सर्व रसप्रधान, द्वैतप्रतिपादक आणि सृष्टीच्या गूढ तत्त्वांचें आकलन करण्यांत गुंग झालेली दृष्टीस पडते.

या दोन संप्रदायांतील तत्त्वविरोधामुळें एक संप्रदाय दुसऱ्याची टवाळी करीत असलेला पुष्कळ वेळ आढळतो. एकाद्या वनांतल्या फुलाला उद्देशून नानाप्रकारच्या मनोहर कल्पनातरंगांत वाहणारे व आपणाबरोबर रसिकांसही खेचून नेणारे परलोकवासी रेव्ह. टिळक एकादा भटजी तें फूल तोडून शंकराच्या पिंडीवर नेऊन टाकील या भीतीनें विव्हळ होतात, याचें कारण त्यांच्या मनावर पडलेली पाश्चात्य संस्कृतीची छाप होय. याच्याउलट हिंदु संस्कृतीचा एखादा कवि शंकराच्या पिंडीवर पडण्याचें भाग्य न लाभल्यामुळें, एखाद्या शापग्रस्ताप्रमाणें अरण्यांत काळ कंठणाऱ्या त्या फुलाची कींव करील हें उघड आहे. दोघांच्याही कविता उत्कृष्ट असतील; पण संस्कृतिभिन्नत्वामुळें दोघांच्या विचारांच्या दिशेंत फरक पडल्यावांचून राहाणार नाहीं.

ही पाश्चात्य संस्कृति कवींना जशी थोडीफार भोंवली तशीच ती रसिकांनाहि भोंवली आहे. सृष्टीच्या लीलांत, निर्झरांच्या उड्यांत आणि पर्वतांच्या शिखरांत गुंग होणारा वर्ड्स्वर्थ कवि हिंदुसंस्कृतीला अडाणी व बालिश दिसेल आणि त्याचे

सृष्टिलीलाविषयक उद्गार हिंदु दृष्टीला एखाद्या अजाण अर्भकाच्या बरळ-ण्याप्रमाणें दिसतील; पण तो हिंदु संस्कृतीचा मनुष्य जर सहृदय असेल तर वर्डस्वर्थ कवीचे ते उद्गार आपल्या मुग्धपणामुळेंच अत्यंत हृदयस्पर्शी आहेत असें त्याला आढळल्यावांचून राहाणार नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें असतां संस्कृति कोणतीही असली तरी चांगल्या प्रतिभेचा विलास सहृद्य मनुष्याला मनोहर वाटल्यावांचून राहात नाहीं. पण जेव्हां एकाच संस्कृतीची छाप रसिकाच्या मनावर वाजवीपेक्षां अधिक बसून त्याच्या सहृदयतेला बाधक होते व त्याला विकारवश करिते अशा वेळीं तो रसिक आपल्याहून भिन्न संस्कृतीच्या कवितेचा यथार्थ आस्वाद घेण्यास नालायक बनतो.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे रसिक मनुष्य स्वत: कोणत्याही संस्कृतीचा अभिमानी असला तरी कवि ज्या संस्कृतीचा असेल त्या संस्कृतीशीं एकदम समरस होण्याइतकें त्याचें मन निर्विकार व लवचिक असलें पाहिजे. तसें तें असेल तर मृतपत्नीकरितां शोक करणाऱ्या अज राजाचा विलाप वाचतांना त्याच्या डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह सुरू होईल आणि लगेच वसिष्ठ ऋषींकडून त्याला आलेला उदात्त संदेश वाचून त्याचें मन शांत होईल. बरें, " रघुवंश " बाजूस ठेऊन त्यानें " अभिनवकाव्यमाला " हातीं घेतली तर मेलेल्या राज-हंसाकरितां आक्रोश करणाऱ्या नव विधवा आईबरोबर तोही आपले ऊर बडवून घेऊं लागल्यावांचून राहणार नाहीं. "राजहंस माझा निजला" ही कविता वाच-तांना कालिदासाच्या दिव्य संस्कृतीशीं गडकऱ्यांच्या धेडगुजरी संस्कृतीचा विरोध पाहून जर तो आपलें मन गडकऱ्यांच्या कवितेविषयीं कलुषित करून घेईल तर तो रसिकच नव्हे ! वसिष्ठांच्या संदेशांतील भव्य तत्वज्ञान जितकें हृदयंगम आहे तितकेंच आपला " राजहंस " मेला आहे ही नुसती कल्पनाही ऐकावयास तयार न होणाऱ्या विधवेचें मुग्धपण हृदयस्पर्शी नाहीं काय ?

आमचे ' यशवंत ' कवि यांपैकीं पहिल्या संस्कृतीचे दिसतात; तथापि त्यांच्या कवितेंतही क्वचित आंग्लसंस्कृतीची छाया पडलेली दिसून येते. प्रसाद, मधुर शब्दयोजना, मनोहर कल्पना, रसांची विविधता वगैरे गुण त्यांच्या कवि-तेंत सर्वत्र आढळून येतात. पण यासंबंधीं आपण विशेष चर्चा न करितां तें काम रसिकांवर सोंपवून व यशवंत कवीच्या तर्फे त्यांच्याकडे " नीरक्षीर-विवेका "ची याचना करून त्यांची रजा घेतों.

सांगली,
भाद्रपद शुद्ध १
शके १८४३

गोपाळ गोविंद मुजुमदार.

# यशवंतीचा तानाजी

## कै. श्री. हनुमंत गंगाधर स्वामी चाफळकर.

जन्मतिथी—फाल्गुन वद्य १३, शके १८१६



पुण्यतिथी—आश्विन शुद्ध १, शके १८४०

त्या सिंहाच्या—तानाजीच्या समाधिभंवताली
यशवंती आढळेल दुःखें भटकत असलेली

(डे. प्रिं. वर्क्स, पुणें शहर.)

# यशवंती.

चाल—( धन्य शिवाजी. )

दख्खनचा चंडोल हरपला कोठें केंव्हां ती
साक्ष देतसे कोंडाण्याचें प्रथित नाम जगतीं ।
कोठें त्याची–उमरावाची बिजली यशवंती
जिच्या जिवावर तद्विजयाची मदार बहु होती ॥
हाय ! विसरले लिहावया ते अखबारनवीस
इतिहासाची उणीव कविला करि कासावीस ।

* * * *

ध्वजा फडकते पाहुनि माना डोलविते जनता
कशावरी ती उभारलेली कुणी न परि बघता ॥
प्रासादाचें शिखर पाहुनी प्रेक्षक तुष्ट मनीं
परि कारागिर कोण तयाचा पुसेचना कोणी ।
व्यवहारी जनतेची असली कठोर ही रीती
सांग शारदे ! तूं तरि रसिका कोठें यशवंती ॥

* * * *

त्या सिंहाच्या-तानाजीच्या समाधिभंवताली
यशवंती आढळेल दुःखें भटकत असलेली ॥

# शिशुचुंबन.

आला सोसुनि कष्ट फार सदना तृष्णाक्षुधापीडित,
काया टाकुनि आसनावरि पडे श्वासांप्रती सोडित ।
आलें रांगत तेथ बाळ जवळी, घेई मुका गोडसा
कष्टांचा परिहार होइ बघतां त्या राजसा पाडसा ॥

प्रीतीच्या लतिकेवरि विकसलें तें फूल कीं मोहक
किंवा जें पहिलें रहस्य उडलें त्याचें नवें द्योतक ।
वंशाचें अथवा रमे सदनिं त्या चैतन्य वा भूषण
येतां तें निकटीं तदीय जनकें द्यावें न कां चुंबन ? ॥

कानीं डोलति डूल लाल पडली त्यांची कपोलीं छटा
गालाला टिकलीवजा खुलविती त्या काजळाच्या तिटा ।
केसांची कुरळ्या चमू उतरली भालप्रदेशावरी
कांहींशी हंसरी छबी खुलतसे ती कांवरी बावरी ॥

थोडासा थबके पुनः दुडुदुडू येई पुढें रांगुनी
आईची चिटकी श्रवूनि बघतो मागें जरा वाकुनी ।
" ये राजा, छकुल्या, तुला बघ नवा खाऊ असे आणला
आधीं एक मुका परंतु मजला दे गोडसा चांगला " ॥

ताताच्या मग लालुचीस भुलुनी येई पुढें धांवुनी
प्रीतीचुंबक आइचा जरि तया सोडीहि भांबावुनी ।
स्पर्धा ती शिशुचुंबनास्तव अशी मातापिता यांमधें
पाहोनी कविला मनीं गुदगुल्या संतोष आनंद दे ॥

सांगूं काय तुह्मा किती तरि असे गोडी अहा चुंबनीं
नाहीं ठाउक ती सुधा परि गमे याच्यापुढें ती उणी ।
क्षुत्तृष्णा शमती तशा क्षणभरीं आपत्तिच्या वेदना
देती मोदहि बोबडे वच, तसा देई द्विजा वेद ना ॥

ज्योत्स्ना-रश्मि धरून हास्य शशिचें आलें शिशूंच्या मुखीं
नेत्रीं मोहक दिव्य तेज मणिचें जो वासुकीमस्तकीं ।
देई कोमलता गुलाबकलिका नाचे तिथें मोहनी
प्रीतीची मदिरारुचीच अधरीं लाधे अशा चुंबनीं ॥

---

# पार्वतीबाईची निराशा.

चाल—" उद्धवा शांतवन कर जा० "

हें नशीब माझें फुटलें । आशेचे तंतू तुटले ॥ धृ० ॥
एकदां वृक्ष जो वठला । तो पुनः न कधिंही फुटला
एकदांच तारा तुटला । पुनरपि नभिं येइल कुठला ?
सौभाग्य रंग जो विटला । तो येइ न जीवित-पटला
चिकटुनि मी मायापाशा
उभविल्या मनीं बहु आशा
परि आज पावल्या नाशा
पाषाण कधीं कां फुलले ? । जरि सुधासिंचनीं भिजले ॥१॥

' श्रीमहादेव ' कां ' अल्ला ' । प्रिय कोण भरतभूमीला
हा निकाल लावायाला । भवितव्यचि आंखायाला
घेउनी महाराष्ट्राला । जन-इच्छा-सामर्थ्याला

ते गेले मत्प्राणपती
केली दंगल पानपतीं
यवनांचा दंडुनि नृपती
तक्ताचीं केलीं छकलें । पारि अंतीं दैवाचि चकलें ॥ २ ॥

घातला समरदेवीला । अभिषेक रुधिर-धारांचा,
कंठांत आर्पिला हार । लक्षावधि शिर-सुमनांचा,
दाविला महा-नैवेद्य । मग तितुक्याही प्राणांचा,
जरि केला ' हर हर ' गजर
तृप्त परी होई न हर
गुदरला भयंकर कहर
जरि लाख बांगडी फुटली । हाय ! जयश्री पारे विटली॥३॥

पातले स्वदेशीं ऐशी। शुभ वार्ता कळतां मजशी
मम मनोरथाला भरती । आली अनिवार किती ती
जणुं वारा ईशकृपेचा । सुटला ज्ञाणें मांगल्याचा
पारि ' नाना ' येउनि पुढती
मम सुखांत कालवि माती
परदुःखें त्या तोषविती
ते विघ्नसुखी मज गमले । पारि मीच अभागी ठरलें ॥ ४ ॥

देऊनि दूषणें नाना । मीं तुह्मा दुखविलें नाना !
ती माझी भोळी कलना । मी फसलें असतें दीना !
पेशवे-कुळाची कीर्ति । रक्षिली तुम्हीं यत्नांतीं
तो-तया पूर्ण ओळखुनी
' तोतया ' असें ठरवोनी
वांचविली ही निज-भगिनी
याचना क्षमेची करितें । पायांतें तुमच्या धरितें ॥ ५ ॥

' तोतया ' असें ठरलें ना ? । 'ते' पानगतीं निजलेना ?
संग्राम केसरी माझे । रण-देवी-अंकीं साजे
हें अतां जिवाचें ओझें । वाहतेस कां तूं वांझे ?
सौख्याचा तुटला झोला
कोठुनि घेशिल आंदोला ?
जा सोडुनि भू-लोकाला;
ही विझवी प्राणज्योति । तूं खरी करंटी मूर्ती ॥ ६ ॥

कलहंस सरोवरिं आला । क्रीडा नव खेळायाला
भूषविलें निज-वंशाला । मोहविलें इतर जनाला
लाजविलें रिपु-पंक्तीला । तोषविलें निज पितराला
हाय ! परी ओढुनि त्याला
नेलें नक्रेंचि तळाला
आशांकुर पूर्ण जळाला
या जगांत कांहिं न उरलें । तें सर्वस्वचि मम सरलें ॥ ७ ॥

* * *

पार्वती ! न अजुनी सरलें । दुःखाचे डोंगर उरले
निज गत-स्मृतीचे घाव । हृदयावरि दे त्या ठाव
ह्या सद्यःस्थितिच्या ज्वाळा । जाळणार निशिदिनिं तुजला
हे दैव-दुर्विलासाचे
उपभोग तुला द्यायाचे
आहेत; नच चुकायाचे
निज आयुष्याची स्मरणी । ओढीत बैस दिनरजनीं ॥ ८ ॥

# चातकाशीं संवाद.

कवि:—कां येथें घरट्यांत बैसुनि उगा बा चातका ! राहसी ?
ऐसा 'आ' पसरूनि, वाट बघुनी मेघोदका इच्छिसी ?
गेले बा ! दुकतेच मेघ निघुनि; कालावधी त्यांचिया
येथें आगमना नभीं पुनरपी लागेल कीं व्हावया ॥ १ ॥

चातक:-गेले ना घन ? जाउं देत; फिरुनी येतील केव्हां तरी
त्यांची वाट सुखें अगा कवि सख्या ! पाहीन मी तोंवरी ।
कांहीं काल असा, पुढें मग तसा केव्हां तरी येइल,
झालें कीं मग ! खास येथ मजला माझा हरी देइल ॥ २ ॥

कवि:-येते कींव किती तुझी अहह ! हे मित्रा ! खगा ! मन्मना
आहे विस्मयकारका बहुत ही ऐशी तुझी कल्पना ।
आहे पंख दिले तुला, हरि तुझें देणें न लागे अतां
ऐसा घालवितोस वेळ मग कां मूर्खा तृषापीडिता ॥ ३ ॥

सारे बांधव हे तुझे बघ कसे भक्ष्यास शोधावया
मोदें हिंडति नित्य भागवुनिया तृष्णाक्षुधा ध्यावया ।
यत्नावांचुनि लाभतां नच खरें माधुर्य त्या वस्तुंत
मेघाच्या उदकाहुनी मधुर तें पाणी स्वकष्टार्जित ॥ ४ ॥

चातक:-वाक्पांडित्य कशास बा ! करिशी तूं माझ्यापुढें आपुलें
मार्गे जा अपुल्या, तुझें मज नसे ऐकावयाचें भलें;
प्यायाचें जरि तें मला तरि खरें प्राशीन मेघोदक
हा बाणा, अथवा सुखें मरिन ही; मी जातिचा चातक॥५॥

कविः-हे मूढोत्तम चातका ! श्रवुनिया बाणा तुझा उज्ज्वल
निंदूं, कां स्तवुं वा हसूं, रडुं तरी ! होई मनीं गोंधळ; ।
जे कर्तृत्वशिरोमणी उचित हा बाणा तयांना तरी
जे कर्तृत्वविहीन ते करुनियां घेती स्वनाशा परी ॥ ६ ॥

बाणा 'मेघजलास सेविन' जरी, जा ऊठ जा सत्वरी
शौर्यानें निज शक्तिनें वळवुनी जा आण मेघा तरी ।
त्यांचे प्राशुनि बिंदु दाखवि मला, बाणा तरी शोभला
ऐसें होइ न जोंवरी तव करें; निंदू नये कां तुला ? ॥ ७ ॥
"माझा देइल तो हरी" भ्रम असे त्वन्मानसीं व्यर्थ हा
कष्टावांचुनि तो हरी न सखया ! कोणास देई पहा ।
आकांक्षा जरि थोर ही तव मनीं "खावें तुपाशीं सदा"
घामानें निढळाचिया करुनिया ती तृप्त ध्यावी तदा ॥ ८ ॥

बाणा केसरिचा असे -तृण कधीं सेवावयाचें न तें
तो गंडस्थळ फोडितो परि कसें जिंकूनिया हस्तितें ।
सामर्थ्याकर तूं तयासम तसा होऊनिया पांखरा
ऐसा हा अभिमान मानासिं धरीं; बाणा तरी तो खरा ॥९॥

राहोनी घरट्यामध्यें उगिच का लाभेल अन्नोदक ?
दे, हा आळस हट्ट टाकुनि; तयामाजी नसे कौतुक
तोयें सारस हें तुडुंब भरलें आहे कसें सुंदर ! ।
हीं येथें बघ रे ! फळें लटकलीं आहेत वृक्षावर ॥ १० ॥

मत्प्रीत्यर्थ तसें तुझ्यास्तव असे ह्या निर्मिलें सृष्टिला
ती अव्हेरुनि आत्मनाश करुनी घेऊं नको आपुला
ये ! घे प्राशुनि गोड निर्मल जला; प्रार्थी प्रभूतें मग
"वर्षाकालिं विभो ! सुवृष्टि करि गा ! नांदो सुखें हें जग" ॥११॥

# रिपु साचे मानवतेचे.

[ तिसऱ्या वर्गांतील उतारू—लक्ष्मीपुत्रानें डब्यांत शिरणाऱ्या 'अंत्यजाला' केलेला प्रतिकार पाहून ]

चालः—" राजहंस माझा निजला. "

कां करितां ऐसा द्वेष ? सकल–पिता एकचि ईश ॥
या भारत–भूमीवरती । जन बंधू–भगिनी असती ॥
हे 'अंत्यज' असले म्हणुनी । कां त्याज्यचि झाले भुवनीं ? ॥
एकाच गुलाबावरती
बहु पुष्पें फुललीं असतीं
त्यांतील खालचीं होतीं
कां तेज–सु–सौरभ–हीन ? कल्पनाच तुमची जाण ॥१॥

एकल्याच या आकाशीं । तेवतात तारा–राशी ॥
वितरती शांति–साम्राज्य । प्रीतिचे गाति हित–गूज ॥
संकेत विभूचे खोल । समतेचे कथिती बोल ॥
जरि कांहीं मेघाखालीं
तारावलि लपुनी गेली
त्याज्यता कां तया आली ?
जरि गणाल हीन तयांना । कल्पनाच तुमची जाणा ॥ २ ॥

तुमचिया वैभवोन्मादीं । अति निष्ठुर हे पडसाद ॥
तुच्छता निदर्शक निघतां, । कर्णांतरिं त्यांच्या रिघतां
असतील होत हो ! छकलें । हें तुम्हांस कैसें न कळे

जे विकार तुमच्या हृदयीं
तैसेच तयांना पाही
भिन्नपणा कांहीं नाहीं
मग उगाच कां हा द्वेष ? मनिं ठेवा करुणा-लेश ॥३॥

कांहिं काळ एका वृक्षीं । जमतात ज्यापरी पक्षी
तैसे ह्या पृथ्वीपृष्ठीं । आत्म्यांच्या जमल्या यष्टी
निर्देश विभूचा होता । लागेल त्यजाया जगता
पृथ्वी परि गणुनि मिराशी
लक्ष्मीसुत करिति मिजासी
तृणसम समजुनि इतरांसी
धनवंतचि सहृदयतेचे । रिपु साचे मानवतेचे ॥४॥

## जलदुर्ग आणि तारा.

येथें सागरतीरिं दुर्ग विलसे प्राचीन हा दुर्गम
गेले गाजवुनी नृपोत्तम जयासाठीं महा विक्रम ।
वाटें हें जलदेविनें निजविलें अंकावरी बालक
किंवा ध्यान धरी जळासनिं इथें कोणी मुनी सात्विक ॥१॥

लाटा स्पर्शिति येउनी हळुंहळूं जाती पुन्हां मागुती
लोकांच्या जणुं झुंडि त्या मुनिपदीं लोटांगणें घालिती ।
किंवा भक्तजनीं फुलें उधळलीं पायांवरी त्याचिया
माता मौक्तिक-मालिका चढवि कीं कंठांत बाळाचिया ॥२॥

या साऱ्या कविकल्पना सुखविती कांहीं जनांच्या मना
कांहींना परि दृश्य तें दुखवितें, देतें महायातना।
कोणीही न मनुष्य आज दिसतो, नांदे तिथें शून्यता
काळाचा महिमा असा बघुनिया वाटे उदासीनता ॥३॥

हा निर्मानव दुर्ग वारि–विहिना भासे महा वापिका
किंवा वारि अगाधही नलिनिची नाहीं परी कर्णिका।
कीं चेतोहर ती असूनि नलिनी जैशी मरंदाविना
तैसें तेथिल दुर्गदृश्य बघुनी येई मनीं कल्पना ॥४॥

किंवा जेंवि सुवर्ण–पंजर गृहद्वारीं पिकावांचुनी
किंवा शुष्क पयोद–पंक्ति विफला जैशी नभीं हिंडुनी।
कीं देवालय देवमूर्तिविहिन प्राणाविना कीं तनू
वस्त्रें सुंदर भूषणेंहि जंव सद्रूपावना ती जणुं ॥५॥

कीं वाटे रसिकांप्रती जंव अलंकाराविना काव्य तें
कीं जेंवि प्रतिभाविहीन कवि तो तज्ज्ञांचिया सन्मतें।
कीं जेवी दिसतात शुक्तिपुटकें सन्मौक्तिकावांचुनी
येथें हा नर शून्य दुर्ग बघुनी ऐसेंच वाटे मनीं ॥६॥

तद्वारें पडलीं सताड उघडीं ना हालतीं तेथुनी
जातां प्राण निघोनि जेंवि पडतें कीं तोंड ' आ ' वासुनी।
आतां कांहिं नसेंचि आंत उरलें हें दाखवीतीं जना
त्यांची केविलवाणि दुःस्थिति महा ती क्षोभवीते मना ॥७॥

लाटांच्या धडकांस जे न फुटले गोळ्यांस तोफांचिया
कल्पांतावरि जे अभंग टिकते कांहीं न होतां जया।

देश-द्रोहि हरामखोर पशु जे-त्या दुष्ट लोकांचिया
गेले ते तट भंगुनी फितुरिनें--स्वार्थास धिकू त्यांचिया ॥८॥

हा ! हा ! ढासळुनी बुरूज पडले ते जागजागीं अतां
छे ! छे ! ढासळले बुरूज नच ते ! कीर्तीच ती तत्वतां ।
किंवा स्वस्थिति शोचनीय बघुनी जी राहिली होउनी
दुःखें ढाळित दुर्ग हाय ! बसला अश्रूंस नेत्रांतुनी ॥९॥

किंवा मंगळ-सूत्र हाय ! तुटलें कंठांतुनी देविच्या¹
त्याचे ओघळुनी मणी पसरले पायापुढें ते तिच्या
किंवा फाटुनिया तिचें वसन तें बाहेर लज्जा पडे
आक्रंदे निजपुत्र दीन दुबळे पाहूनि हे बापुडे ॥१०॥

देखावा कटु तेंवि भीषण तसा तेथील तो पाहुनी
वाटे खेद मनांत नंतर तनू जाईच संतापुनी
पाहाया जलदुर्ग तो नयन हे माझे चला घेउनी
देतो ग्वाहि तुम्ही असेंच मजला सांगाल हो ! येउनी॥११॥

*   *   *   *   *

ह्या दुर्गावरि हा पहा चमकतो तारा नभोमंडळीं
वाटे सूक्ष्म निरीक्षणास बसला कोणी कवी त्या स्थळीं ।
तद्रूपें अथवा कुणी तरि नृपोत्तंस प्रतापी वसे
रक्षाया निज पूर्व-जीवित-धना होतें जयाचें पिसें ॥१२॥

बा ! तान्या ! सखया ! कविप्रियतमा ! कां तूं तिथें बैससी ?
कां हें वैभव आपुलें उगिचची ह्याच्यापुढें दाविसी !

---

१ राष्ट्रदेविच्या

ज्यांची पूर्वी तुझ्याहुनी सुधवला कीर्तिप्रभा फांकली
काळानें उदरीं परी पचविली ती भूर-रत्नावली ॥१३॥

कोणीही न करावयास तुजसी स्पर्धा इथें आजला
तोऱ्यानें मिरवावयास म्हणुनी हा काल का साधिला ?।
नाहीं आढळलें अपौरुष कधीं ऐसें तुझें वर्तन
जातीचा रणशूर घेइ न कधीं लावूनि हें लांछन ॥१४॥

किंवा पूर्वज सद्गुण-द्युति-कथा तूं सांगशी तेथुन
हृत्क्षोभप्रद ज्यास होइल असा नाहीं तिथें सज्जन।
धिंगाणा असतील निर्भयपणें घालीत रात्रिंचर
त्यांना काय कथानिवेदन तुझें हे मित्र! तेजाकर! ॥१५॥

जेथें दिक्पट भेदकारक असा वाद्यध्वनी गाजला
"घू घू" शब्द करून तेथ घुबडे संचारती आजला।
जेथें वायुसवें मुदें विहरला झेंडा रणप्रेरक
पाकोळ्या घिरट्यास घालिती तिथें हें का न हृद्भेदक ? ॥१६॥

आली भग्न दशा, सुरूप सगळें गेलें लया साजिरें
ते प्रासादहि भंगले, अहि महा तेथें विषारी फिरे।
जा जा! हे सखया! नकोस शिणवूं तूं आपणातें वृथा
अंधा काय असे सुतेज ? बधिरा त्या काय होती कथा ? ॥१७॥

किंवा थांब, सख्या! असेंच अपुलें तूं चालवी गायन
कोणाच्याहि मनास जागृति कसें देईल हें काय न ?।
कोणी नाहिं मनुष्य तेथ म्हणुनी बा! काय झालें असें ?
स्वत्वध्वांत यदीय मानसिं तया स्वत्तेज हें कायसें ? ॥१८॥

नाहीं मानव ते, नसोत; परि हे पाषाण, ही मृत्तिका
यांना मानिसि तुच्छ काय ? गणिसी तूं यांस निर्जीव कां ?।
सांडोनी नर-रक्त-तीर्थ शरिरीं जे जाहले पावन
शौर्यस्पर्शहि लाभला सतत ज्या ते हेच धूलीकण ॥१९॥

चालूं दे ! तव हें अखंडितपणें गाणें असें स्फूर्तिचें
पाषाणांतुनि मृत्तिकेंतुनि पहा आत्मे नव्या दीप्तिचे।
जागे होउनि दावतील जगतीं शौर्यप्रभा पाडुनी
डोळानें गतवैभवा परतुनी घेतील संपादुनी ॥२०॥

* * * * *

माझें गायन मीहि गात बसतों येथें तुझ्या जोडिला
ये चैतन्य अनंत देउं सखया ! या प्रेतवत् पृथ्विला ॥

## संभाजींचा पश्चात्ताप.

चालः—"निरोप द्यावा बाळा०:--"

महाराष्ट्र—भू—माते ! घेंई प्रणाम माझा शेवटचा ॥धृ॥
तूं मम माता, परि मी नव्हतों तव सुत आजवरी ।
भरली घटिका शेवटची ही आतां मज नच झिडकारी ॥१॥

केलीं कृत्यें कुटिल ! छे नको अतां उजळणी त्यांची ।
पश्चात्तापें आज उजळली जीवज्योती मम साची ॥२॥

यवन भूपती तृषित असे जरि माझ्या रुधिराचा ।
शक्त तो परि ग्रास घ्यावया नच माझ्या ह्या हृदयाचा ॥३॥

ह्या हृदयाचे-जीवात्म्याचे अणुरेणु स्वैर ।
मुक्त होउनी दाहि दिशांतुनि करतिल आतां संचार ॥४॥

जीवात्म्याचा बंदिवास हा टळतां तत्खड्गानें ।
अंतराळिं तो गाइल मोदें दास्य-विमोचन-गानें ॥५॥
देशभक्तिच्या गान-लहरिनें देहभान विसरून ।
दंग होउनीं, पूर्ण रंगुं दे त्यांत मराठा संपूर्ण ॥६॥
यवनभूपती मला न वधतो, वध करि मम देहाचा ।
राष्ट्रदेवि ! तव पदीं वाहिला नैवेद्यचि परि जीवाचा ॥७॥

---

# मधुकराचें आत्मनिवेदन.

( द्रुतविलंबित. )

कविसख्या ! तव बालिश बोल ते,
श्रवुनि फार कुतूहल वाटतें;
सरलता मनिं जी तव दाटते
स्फुरविते हृदयाप्रति, ऐक तें ॥१॥

वनविहार रुचे तुजसी जसा,
रुचिर तेंवि गमे मम मानसा,
व्यसन-साम्य सख्या ! जुळतां असें,
हृदय-मीलन कां नच होतसे ? ॥२॥

परि तुझे वच-‘ कांति न सुंदर ’
उपजवी मनिं फार अनादर;
शिखिसमा मम कांति मनोहर,
जणुं नितान्त सुनील पयोधर ॥३॥

करित मी न वृथा स्तुति आपुली,
खचित कांति तशी मज लाभली;

रमवि ती नच कां तव मानसा ?
जरि न ती रिझवी, कवि तूं कसा ? ॥४॥

क्षणचि आणखि थांब सख्या जरा
परिस बा ! मम मंजुळ ही गिरा,
उगिच कां जनता–मन–चुंबक—
तरि असे नसता गुण मोहक ? ॥५॥

सुरसता नसतां सुर–सप्तकीं,
परिसता मम गायन कोण कीं ?
परि नसेंचि तसें; मम गायन
भुलविते मधु मोहिनि घालुन ॥६॥

भ्रमर–गुंजित रंजवि ना जया
रसिक केविं म्हणूं तरि मी तया ?
'रसिक तूं' समजूं, तरि कां अहा !
कविसख्या ! करितोस सवाल हा ॥७॥

कमलिनी रमणी मधु–दायिनी
विकसती हंसती मम गायनीं;
इदनुराग–मरंद–सु–सेवनीं
मजविना अधिकारि नसे वनीं ॥८॥

अशन तो करितां मग सत्स्वर
मधुर हो; करिती मग मत्सर
सकल कोकिल आम्र–तरु–स्थित
वदुनि तेथ कुहूकुहु—कूजित ॥९॥

श्रुतिपथावरि तो जरि आदळे
परि मनस्थिरता कधिं ना ढळे
ठरविलें निजवर्तन हें असें
म्हणुनि मोहविलीं जन–मानसें ॥१०॥

---

# नाद्–नटी.

चालः—' आनंदाचा कंद० '—

" आनंदाचा कंद " ऐकुनि आनंदें नभ कोंदलें ।
गान--ब्रह्में सकल व्यापिलें, विश्व डोलुं हें लागलें ॥ ध्रु ॥

' नेति नेति ' जें वेद बोलले
नारदास जें ना कळे,
रूप ठाकलें, तेथ पाहिलें; समाधान तें लाधलें ॥१॥

सागर–वीची--नूपुर घालुनि
नाचुं लागली रजनि--कामिनी,
पवनकंपनीं ताल धरोनी, तारे प्रेक्षक दाटले ॥२॥

त्यांत रंगतां हृदस्थ आत्मा
जीव-- ज्योती समाधिसुप्ता
अनंततेची प्राप्ती साची, विलीन ' मी–पण ' जाहलें ॥३॥

नयन तारका ? श्वसन वायु कां ?
सिंधु--तरंगचि हृदय होय कां ?
देह सृष्टि कां ? प्राण गान कां ! सर्व मीच कीं भासलें॥४॥

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १९८८
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

# काव्यानंद.

( शिखरिणी )

सुतीक्ष्णा चंचूनें कुरतुडुनि दाडिंब-कवचें
शुकानें सेवावें सुरसयुत सांचे हृदयिंचे; ।
तसें काव्यप्रेमी मन मुदित व्हावें उकलुनी
कवींचें सत्काव्यांतर मधुर जें गूढ-रचनीं ॥ १ ॥

वधु व्रीडायुक्ता नवपरिणता तेंवि रुषिता
तिचा हेतू यत्नें मनधरणिनें तो उगमतां ।
युवा पावे सौख्यासह हृदयिं धन्यत्वहि जसें
मनानें मोदावें उकलुनि सुकाव्यांतर तसें ॥ २ ॥

असावीं तीं जैशीं जलनिधितळीं शुक्तिपुटकें
करोनी तत्प्राप्ती मग हुडकणें मौक्तिक निकें ।
प्रवेशातें तैसें नव-रसधिमाजी करुनियां
मनानें मोदावें कवि-कवन-गूढा कळुनियां ॥ ३ ॥

दिसावी सूर्याच्या कर-निकरिं दिव्या धवलिमा
असावी हो आविष्करणिं विविधा रंग सुषमा ।
स्थिरावे जी व्योमीं सुरधनुंत अन्योन्य-विलिना
विभागावी सुज्ञें तशि सु-कविता-गूढ-रचना ॥ ४ ॥

असे गुंतागुंती बहु घडलि जी मौक्तिक-सरीं
निवाराया तीतें नृपति-वनिता घे निज करीं ।
तिनें संतोषावें पदर सुटतां ते वरि वरी
सुधी पावे काव्यांतर उकलुनी मोद-लहरी ॥ ५ ॥

लतापर्णीं फुल्ला लपुनि असलेल्या नव सुमा
द्विरेफें सेवावें हुडकुनि मरंदा अनुपमा ।
पदीं लालित्याच्या तरल पटला दूर करुनी
रमे तैसा ज्ञाता उमगुनि सुकाव्यांतर मनीं ॥ ६ ॥

जसें या भूगर्भी विहरति रसाचे बहु झरे
तया भू-शास्त्रज्ञाविण नुमगती लोक दुसरे ।
प्रमेयें गूढत्वें ग्रथित कवितांतर्गत तया
न जाणे सारज्ञाविण; दुजि न पावे मति लया ॥ ७ ॥

---

## गुडी पाडवा.

उठा मर्द हो, स्वातंत्र्याच्या गुड्या पताका झणीं
उभारा निजकर्तव्यांगणीं ॥
दिव्य सनातन धर्माचें तें पटल लावुनी वरी
झळकुं दे त्यावरि ही वैखरी—
" राष्ट्रदेविच्या भव्य मंडपीं ऐक्य साधुनी असूं
कंबरा स्वस्वरक्षणा कसूं " ॥
असा बिनीचा तुरा अंबरीं फडकूं जर लागला
जनोदधि समजा हेलावला ॥
ही गोष्ट न कथितों जरी आज मी नवी
परि उदया येतो नव्या युगाचा रवी
ही म्हणुनी ऐशी स्मृती द्यावया हवी
उदित रवीच्या तेजाचे हे उडति फवारे जसे
दाखवा निज शौर्याचे तसे ॥

---

# " कुंची "

( कवीच्या वैभवाला साजेसा आहेर याच्याशिवाय दुसरा कोणता असणार ? )

( पाळणा )

बाळा जो जो रे । सुखसदना । शामराज-नंदना ॥
नवविकसित कुसुमा । विश्रामा । कुललति पावो सुषमा ॥
सस्मित मुखपद्मा । गुणसद्मा । नुरवीं चिंता-छद्मा ॥
हे राजसहंसा । युवराजा । जनकजननीच्या कलिजा ॥
हे मंगल तारे । राया रे । सुखवो तव तनु सारे ॥
शुक्लेंदूसम ती । बहु कांती । वृद्धिंगत हो पुढतीं ॥
कारंजातुनि ती । सभोंवतीं । हिमसम सीकर-पंक्ती ॥
मौक्तिकसम पडते । तैसें ते । तव गुण पसरो भंवते ॥
कीं निशिगंधाच्या । गंधाच्या । दरवळत्या वीचीच्या–॥
सम लीला तुमच्या । सकलांच्या । हृदया खुलवो साच्या ॥
कधिं काळीं कविला । त्या लीला । दिसतां तद्हृदयाला ॥
होतिल गुदगूल्या । तान्हूल्या । गोड चिमकुल्या छकुल्या ॥

जो जो रे बाळा । वेल्हाळा । गोविंदा गोपाळा ॥
तुमचे आप्तजन । धनवान । येतिल आज जुळून ॥
कोणी भरजरिची । मोलाची । देतिल सुंदर कुंची ॥
कीं पिंपळपान । तें छान । रत्नखचित आणून ॥
नटवितील तुजला । ते कविला । लाभेल न बघण्याला ॥
एकिकडे दर । जरि फार । पाठवि परि आहेर ॥
कवि यशवंताची । ही कुंची । मानुनि हो घ्यायाची ॥

# तो कर्मयोगी.

( शार्दूलविक्रीडित )

सत्कार्यास्तव सर्वदा स्फुरतसे ज्याची मुदें वैखरी
होई ती बिरुदच्युता नच, जरी लागे गळ्याला सुरी ।
लोभानें नच रत्नहेममणिच्या किंवा चळेना कधीं
ऐसा धीर उदार थोर नर जो तो 'कर्मयोगी' सुधी ॥ १ ॥

ज्याचा देह झिजे अखंडितपणें कार्यार्थ लोकांचिया
माताबंधुपित्यासमान सकला चित्तांत मानूनियां ।
त्यक्त-ब्रीद न पातला जरि पुढें देहावसानावधी
ऐसा धीर उदार थोर नर जो तो 'कर्मयोगी' सुधी ॥ २ ॥

ज्याची तत्परता असे निशिदिनीं देशास रक्षावया
तत्प्रीत्यर्थ सुसज्जही अनशना जो अंगिकारावया ।
शिक्षेनें शरपंजरीं निजवितां मानी तया तल्पसें
ऐसा धीर उदार थोर नर जो तो 'कर्मयोगी' असे ॥ ३ ॥

संपत्काल तसा विपत्समयही ये दैवकोपामुळें
यच्चित्तांतुनि धैर्यनीति न चळे, शांति क्षमा ना ढळे ।
सच्चारित्र्य-तपें जगीं तळपतो जैसा नभीं भास्कर
ऐशा त्या नरपुंगवास म्हणती 'तो कर्मयोगी' नर ॥ ४ ॥

———

# वेड्याचें आत्मवृत्त.

चालः--' नरजन्मामधिं नरा॰'-

असाच असतों उदास हृदयें भटकत भूमंडळीं
कशाची क्षिति न मनीं राहिली ॥

स्वैर लकेऱ्या चंडोलासम कधीं घेत मी असा
स्वतांशीं गुणगुणतों भृंगसा ॥

कसाबसा मज असा बघुनि जन म्हणोत वेडा पिसा
तयाची पर्वा नच मानसा ॥

स्वतांस खुलवी, दुजास रमवी, जगांत वितरी हंसें
असतें असेंच माझें पिसें ॥

असें भावडे पिसे रुचे मज निर्मल निर्हेतुक
खरोखर तयांत मज कौतुक ॥

एक अंतरीं, दुजें आननीं, करणी कांहीं तरी
अर्थ हा सुज्ञपणाचा जरी ॥

नको नको मज विटाळ असल्या सुज्ञपणाचा कधीं
खरा तो कुटिलपणाचा निधी ॥

हो ! सुज्ञपणा तरि कसला हा सोमल ।
तो पचवायाचें असेल ज्याला बळ ।
तो खुशाल त्यानें सेवावा केवल ।

असावयाचा अंत तयाचा त्यांत परी निश्चित
असें ह्या वेड्याचें हें मत ॥१॥

दुर्दैवें मी तारा तुटलों नभांतुनी सोज्ज्वल
लाभलें मातें हें भूतल ॥

पूर्वस्थितिचे चलचित्रपट माझ्या स्मरणांतरीं
कधिकधीं भिरभिरती वरिवरि ॥

गात तेथचीं असतों गीतें कांहीं कांहीं कधीं
न जाणति त्यास येथले सुधी ॥

कांहिंकाहिंचा अल्पांशानें अर्थ समजतां कुणा
तरिच मज्जीवित–सार्थक म्हणा

सुखदुःखाचे हर्ष खेद मज मावळले अंतरीं
उरला भेद न मज भूवरी ॥

आहे माझें तर हें सारें; नाहीं तर नाहिंही
ह्यापरी स्थिति माझी पाहि ही ॥

कर्में करितों सर्व तऱ्हेचीं, नसतों परि त्यांमध्यें
अवाच्यहि जरी मुखानें वदे ॥

ही ओट हातभर टाकुनिया बाटली।
जरि उच्चाटन–घडि केव्हांही पातली।
सज्जता सर्वतोपरिनें मम थाटली ।

पूर्वस्थानापन्न परतुनी तिथें व्हावयास्तव
जाइन करीत विधिचा स्तव ॥२॥

———

# अजिंक्य-तारा पाहून.

येथूनी असतील जैं उतरले पूर्वी मराठे गडी,
भीतीनें वळली असेल रिपुची पाहून ते बोबडी;
आधीं आज कुणी चढे न सहसा, कोणीं चढूं लागला,
त्याची भीति, विषाद, हर्ष अथवा कोणास ना वाटला ॥१॥

छिद्रांतूनि कुठें झरा झुरतसे काळ्या कड्याच्या शिरीं,
मोत्यांचा शिरपेंच तो ढळतसे बोलोत कोणी तरी;
अश्रूंची सरिताच ती गमतसे माझ्या मनाला परी,
कोणाला गतवैभव-स्मृति कटू दे दुःख ना अंतरीं ॥२॥

कोठें त्या कुसुमावृता नवविधा वृक्षावरी वल्लरी,
पुष्पें गाळिती नित्य नित्य अपुलीं कोमेजलीं भूवरीं;
नोहे तें वनदेवि-पूजन, परी त्या अश्रुधारा सदा
दुःखानें जणुं गाळितात लतिका देखोनि ती आपदा ॥३॥

---

# दुरुपयोग.

( शिखरिणी. )

जयांच्या वक्तृत्वाप्रति अनुपम स्वैर बघुनी
नदीकारंजांनीं निजमनिं झुरावें निशिदिनीं
जयांच्या शब्दांनीं सहजचि सुधी अज्ञहि झुले
असत्पक्षा वक्ते सुगुणि असले हाय भुलले ! ॥१॥

जयांच्या प्रासादीं करि कमलजा पूर्ण वसती
कुबेरानें ज्यांना सतत करणें वंदन-तती

जयांना कांहींही निजधनबळें साध्य ठरलें
असत्कार्यासाठीं धनिक असले हाय भुलले ! ॥२॥

शिरीं ज्यांच्या ठेवी वरदकर ती ब्रह्मतनया
यदीय ज्ञानानें विधिमदहि जावा हरुनिया ।
स्फुरावें तें ज्यांचें कलम, जणुं नाचेचि चपला
असत्या दे सत्यस्वरुप असली लेखन–कला ॥३॥

जियेला ब्रह्मयानें स्वरुप दिधलें अद्वितियसें
रती रंभा यांचें जगिं सहज व्हावें जणुं हंसें
मिळावें पावित्र्यें सुररमणि–साध्वीपद जिला
अनीतीचा तीच्या गृहिं अहह ! बाजार भरला ! ॥४॥

करी दीर्घोद्योगा अनवरत काळासम सदा
चळेना केंव्हांही, नगसम जरी येइ विपदा
युधिष्ठीरानेंही अवनत करावें निजमुखा
असे विध्वंसाया मनुज टपले सज्जनसुखा ॥५॥

हमालीपासोनी बहुत अधिकारास चढले
करायाचें आहे स्वकरिं गरिबांचें बहु भलें
जरी घेतां थोडी खटपट, दुवे देतिल जन
उठे तन्नाशाला उलट परि त्यांचें खल मन ॥६॥

अगा आर्यावर्ता ! तुज बहुगुणी पुत्र असती
गुणांच्या ज्ञानाच्या परि दुरुपयोगास करिती
कशी ती यावी गा ! मग तुज तरी सुस्थिति खरी ?
कशी ती जावी गा ! तव अवदशा दुर्धर दुरी ? ॥७॥

---

# वेलीच्या नव अंकुरा !

वेलीच्या नव अंकुरा ! करुं नको येथें प्रवेशास बा !
या येथें भरते न ही प्रतिदिनीं विद्वज्जनांची सभा, ।
स्वेच्छेनें जन चार हे न जमती या भव्यशा मंदिरीं,
दास्यामाजिं कसें तरी ढकलिती आयुष्य तें भूवरी ॥ १ ॥

त्यांची संगति ती कशास तुजला स्वातंत्र्यभोगेच्छुला
दास्याचा जहरीपणा हिणवितो अत्युग्र हालाहला, ।
ऐशा या परतंत्रेंत पळही जावो तुझा ना कधीं
जा, जा, जा, परतूनि येथुनि सख्या ! आहेस ना तूं सुधी ?॥२॥

श्रेष्ठांच्या हुकुमावरून पडतें पाऊल मागें पुढें
नंदीबैल शिरास हालवि जसा पाहून काठीकडे ।
स्वत्वाचे सुविचारही अशुभसे ज्यांना सदा वावडे
प्रेतांचा सहवास काय असल्या राया ! तुला आवडे ? ॥३॥

तेजोवर्धन तें घडेल न तुझें या पारतंत्र्यामधें ?
कैसा स्वैर विहार घेशिल तरी जागेंत ऐशा मुदें ? ।
उच्छ्वासें करपूनि जाइल तुझी गा ! कोमलांगा तनू
उच्छ्वासांत हवा विघातक तुला लोकांचिया या जणूं ॥ ४ ॥

जो चंडोल नभीं फिरे वरिवरि घेतो लकेरी मुदें
स्वातंत्र्यांतिल सौख्य सेवित असें तद्गायना तो वदे ।
त्याला काय गमेल वास बरवा सोन्याचिया पिंजरीं
त्याचा घेइ विचार, येइ मग तूं या येथल्या मंदिरीं ॥ ५ ॥

केकांनीं मयुरांचिया दुमदुमे सारे जिथें पर्वत,
तेथें जाउनि एकचित्त बनुनी, केका रहा ऐकत ।

त्यांचा तूं समजावुनी निजमनीं घे अर्थ तो कोमला !
स्वातंत्र्या त्यजुनी रुचेल मग ना येणें इथें हें तुला ॥ ६ ॥

प्रेमाच्या करलालनांत रविच्या राहूनिया राजसा !
वायूशीं गुजगोष्टि बोलुनि करी क्रीडा किशोरा कसा !
घे कंठीं दवबिंदुमौक्तिकसरा, वृद्धिंगत श्री करी
कल्पान्तींहि करू नको जिवलगा ! येणें इथें मंदिरीं ॥ ७ ॥

---

## बालार्का !

शिखरिणी.

अगा ये बालार्का ! उदय गिरिशृंगीं दिनकरा !
तमोग्रस्ता विश्वा द्रुत उठविण्या दे निज करा ।
निराशेच्या ध्वांता त्वरितचि निवारूनि सखया !
नव्या उत्साहाचें बळ अतुल तें देइ हृदया ॥ १ ॥

किती विश्वामाजीं प्रखरतर दुःखें पसरिलीं !
निवारीतां त्यांतें मम सकल शक्तीहि सरली ।
तुझ्या स्फूर्तींची ती द्युति बघुनि उत्साह निवसे
प्रतीक्षा यासाठीं तव अतुरतेनें करितसे ॥ २ ॥

प्रचीती देवाची मज तुजमुळें पूर्ण कळली
तुझ्यासाठीं माझी अगतिक मती दंग बनली ।
तुझ्या कारुण्याचें मजवरि करी सिंचन सदा
चळावीना माझी मति तवपदापासुनि कदा ॥ ३ ॥

कधीं मी कर्तव्यच्युत दिसुनि आलों जरि तुला
कधीं मी आलस्यीं क्षण उगिच देवा ! दवडिला ।

महोग्रा दीप्तीनें त्वरित तरि शासूनि मजला
खऱ्या कर्तव्याचा जगतिं पथ दावी बहु भला ॥ ४ ॥

कवींच्या स्फूर्तींचा, अनुपम बलाचा जलधिच्या
तुझ्याठायीं ठेवा वसत असतो सांगति ऋचा ।
म्हणूनी मी आलों शरण चरणीं दास दुबळा
त्वरेनें येऊनी फुलवि हृदयाचा मम मळा ॥ ५ ॥

विहंगांची सेना मधुर गुणगानास बसली॥
उषेची या चर्या तव मुख पहायास हंसली
कळ्या वेलींच्या ह्या अतुर तुजसाठीं किति तरी
अगा तेजोराशे ? म्हणुनि झणिं ये हास्य वितरी ॥ ६ ॥

---

# निर्झरिणी

चालः—हा प्रताप जातो.—

ही कोण लाडकी बाला । नाचते या वनामाजी ?
वाळ्याचे नाद-तरंग । ऐकुनिया ही वनराजी
डोलते विसरुनी भान । आनंदें कैशी आजीं

ही कोण कोठुनी आली ?
कां हांसत हांसत गालीं
दुडुदुडू चालली खालीं

मोहुनी मनें सकलांचीं । स्थिर-चर-नर-पाषाणांचीं ॥
बोबडे बोलते बोल । खेळते किशोरी खेळ
अंगणीं जेविं जनकाच्या । अमलांगी सीता लोल
हांसते उठूनी हळुंच । पडते जरि जाउनि तोल

“ ये चुंबन दे लडिवाळे !
म्हणतेस ‘ नतो ’ कां बाळे,
कां दूर पळसि वेल्हाळे !
हा पुरे पुरे ग चाळा । पर्दि घाल जरासा आळा ॥
किति करावयाचा दंगा । गुण किती उधळिसी बाळा !
या मेल्या पशुपक्ष्यांची । लागेल दृष्ट ग तुजला
छे बाई, अचपल फार । आवरते कसली मजला ”!

हे बोल मातृहृदयाचे
वरि नाद बालहास्याचे
ऐकिले कुठुनसे साचे
पाहि जों उघडुनी नयन । निर्झरिणी आली दिसुन ॥ ३ ॥

---

## ‘ मालुं नको ग ! ’

चालः—भाव धरा रे०—

“ मालुं नको ग ! मीं केलं काय तली ग ” ॥ ध्रु ॥

अश्रुबिंदु शिशु-नयनांमधुनी
टपटप खालीं गालांवरुनी
ओसरले, जणुं गगनांतूनी
तारका तुटती । कीं फुलें वेलिचीं गळतीं ॥१॥

वदनचंद्र तो तान्हूल्याचा
किंवा झेला मृदु कुसुमांचा
दीन मलुल तो पाहुनि साचा
हृदय मातेचें । द्रवल्याविण राहिल कैचें ॥२॥

जरी मारि ती माता वरुनी
तरि पायांशीं तिच्या बिलगुनी
मुखाकडे वर चिचकत बघुनी
वदे बेरहाळ –" कां देशी भाई मार ? " ॥३॥

शब्द बोबडे तशांत असले
माउलिच्या जों कानीं आले
क्षणीं तियेचें हृदय द्रवलें
निवाला कोप । गळली छडि आपोआप ॥४॥

घेई चटकन उचलुन वरती
चुंबुनि मोहक रडवी मूर्ती
पदराखालीं स्तनिं लावी ती
तिचेही झाले । अश्रुंनीं नयन मग ओले ॥५॥

निज मातेचें स्फुंदन ऐकुनि
स्तनपानातें देई सोडुनि
मृदु हातानें अश्रु पुसूनी
म्हणे ' आई ग ! । कुणि तुला मारिलें सांग ' ॥६॥

गालासन्निध गाल बिलगला
गळ्याभोंवतीं हात चिमुकला
दुजा आइच्या पुशि नयनांला
दृश्य तें बघुन । निवतील न का कवि–नयन ॥७॥

इतक्यांत चिता ती विझली,
मग रक्षा खालीं उरली,
तींतुन ही गुणगुण उठली,
वातावरणीं दुमदुमली परि कोणि न ऐकियली
म्हणुनि "तारकानाथ" सोडितो ललकारी अपुली ॥१॥

---

## सागराचें उचंबळणें.

चालः— आजि शेवटचा.—

हें तळमळतें हृदय काय कोणाचें
पाहुनी दैन्य देशाचें;
हे स्फुरताती सहस्र बाहू काय
पाहुनी दास्यंरत माय;
कीं देत असे कोणी उत्साहाला
या सुप्तशौर्य जनतेला;
कीं धडपडती बंदीजन हे कोणी
दास्यमुक्त व्हावें म्हणुनी
कीं उभारिले हे कोणी
ध्वज अनंत वातावरणीं
करण्यास जनांची जुळणी
गतविभवाची पुनः प्राप्ति करण्यास
मोहीम चालवायास ॥ १ ॥

---

१ यशवंत कवि.

## शिवनेरी.

शिखरिणी

इथें ठायीं ठायीं प्रतिकणकणांतूनि निघुनी
स्वराज्याचे मंत्रध्वनि फिरति आनंदभुवनीं
महाराष्ट्रीयांनो ! प्रगतिपथगामी सुजन हो !
तयाला ऐकाया बधिर तुमच्या त्या श्रुति न हो ॥१॥

---

## दूषित दृष्टि.

शार्दूलविक्रीडित

वेश्येच्या सदनांत सर्व रजनी जातात ज्यांच्या सदा
मोठें भाग्यचि मानिती नमविणें माथा तियेच्या पदां
गाणें, नृत्य, बजावणें, मजलसी कार्यांत या संपदा
ज्यांची संपुनि जातसे, परि सरे ना अन्य कार्यी कदा ॥१॥

लक्ष्मीपुत्र असे स्वतांस गणती कीं सभ्य आम्ही खरे
लज्जेनें परि जाति ना पिळुनिया त्यांचीं मुळीं अंतरें
कोठें स्त्रीपुरुषांत निर्मल परी बंधुत्व तें देखुनी
यांची कुत्सित जीभ वीष वमते बोटें तया दावुनी ॥ २ ॥

यद्देहांतिल रोम रोम कुजला पापी विचारामधें
यद्बुद्धींतिल तंतु तंतु किडला पापी विलासामधें
दुर्गंधी अति दारुणा प्रतिदिनीं देहामधें दाटली
त्यांना निर्मळ प्रेमबंध असले पापें महा वाटलीं ॥३॥

---

## "शिलंगण."

शार्दूलविक्रीडित

जातिद्वेषपरीध लंघुनि चला एकत्र ठाकूं उभे,
ऐक्याचा बिनिचा तुरा धरुं, करूं मोहीम, जिंकूं सुभे,
स्वत्वाचा पथ आक्रमूं द्रुतपदीं राष्ट्रीय गीतावरी,
सीमोल्लंघन यापरी करुं, लुटूं सोनें स्वराज्यांतरी ॥ १ ॥

---

## स्वर्गीय संजीवनी.

चालः—भाव धरारे.—

बोबडे बोल । बालका बोल बिनमोल ॥
भरला जगताचा बाजार
जो तो जन बेमुर्वतखोर
झाली सोदेगिरि शिरजोर
अशा त्या कालीं । बोल सुधावृष्टी गमली ॥१॥

पोटासाठीं करितां धंदा
व्हावें लागे गुलाम बंदा
स्वत्व संपुनी, दोई निंदा
अशा त्या कालीं । बोल सुधावृष्टी गमली ॥२॥

करुनी सारी ही मुशाफरी
मिळे पोटभर नच माधुकरी
जर्जर झाला जीव यापरी
अशा त्या कालीं । बोल सुधावृष्टी गमली ॥३॥

संसाराची चिता पेटली
दुःखज्वाला तीव्र भडकली
जिवास चोहींकडुनी भिडली
अशा त्या काळीं । बोल सुधावृष्टी गमली ॥४॥

दुर्दैवाचा सदा उन्हाळा
तृषाक्रांत हा प्राणी झाला
झरा सुखाचा पार आटला
अशा त्या काळी । बोल सुधावृष्टी गमली ॥५॥

अपमानाच्या भालेबरच्या
करिति चिंधड्या किति हृदयाच्या
घोर जाचण्या परसेवेच्या
अशा त्या काळीं । बोल सुधावृष्टी गमली ॥६॥

काळ उलटला; माणिकमोतीं
हातीं धरितां होते माती
घरचे घासे खाया उठती
अशा त्या काळीं । बोल सुधावृष्टी गमली ॥७॥

म्हणुनि बालका संतत बोल
स्वर्गीय संजीवनिचे बोल
सांवर माझा कलतां तोल
पुन्हां बाहेरी । होईन भिकारी दारीं ॥८॥

दैव धरूं दे खुशाल दावा
विषण्णतेचा भडको वणवा
फास लागुं दे कसाहि जीवा
तुझे मृदु बोल । देतील धैर्य बिनमोल ॥९॥

विपत्तींत या इहलोकींची
जीवितयात्रा संपायाची
असेल जरि ती घडि यायाची
तरी तव बोल। मृत्युचे क्लेश हरतील ॥१०॥

जीव तुझ्या बोलांत गुंगला
गमेल तरि मग बाळा! मजला
मृत्यु मनोहर शांत जाहला,
पुन्हां जन्मून। बोल तुझ्यासम गाईन ॥११॥

---

## बाल-लीला.

शिखरिणी.

शिरीं वायूसंगें भुरभुरति ते केश कुरळे,
जयांचें धूळीनें वसनहि तसे देह भरले,
पहा खेळामाजी शिशु रमुनि गेले चिमुकले
तरुछायेखालीं रचिति नव कैसें घरकुलें ॥१॥

वनामाजी वाहे झुळझुळ नदी शांत उथळ
तिच्या कांठीं कोठें विहरतिं मुलें सान मृदुल
कुणी पाणी पाटांतुनि चढविती दूर खणुनी
अशा रीतीं बागाइत पिकविती खेळ करुनी ॥२॥

मुलें कोणी जातीं चढुनि जवळी टेंकडिवरी
फुलें नानारंगी खुडुनि जमवीतीं निज करीं
कुठें तो पाचोळा उडुनि पवनें नाद करतां
चपापूनी जाती, परि हंसति मिथ्यत्व कळतां ॥३॥

कुठें थाटे मोठा लुटुपुटित संसार सगळा
कुणी कन्या आई, जनकहि तसा कोणि बनला,
शिपाई डाकेचा शिशु कुणि, भुसारीच बनतो,
छडी घेई कोणी गुरु बनुनि ' श्री-ग ' शिकवितो ॥४॥

कुणी मानासाठीं सहज झटतां होइ कलह
असें होतां होतां कुणि उधळितो खेळ अहह !
कुणी ती कागाळी रडत मग सांगे जननिला,
घडीनें तो होतो फिरुनि सुरुही खेळ सगळा ॥५॥

----

## " मी केवळ तुमचें वारें."

गुरुमुखांतून निघालेली स्तुति कर्णोपकर्णी ऐकल्यानंतरची स्फूर्ति.

चाल—उद्धवा शांतवन०—

यत्कृपासुधासेकानें । काव्यलता मदिय फुलावी
त्या सुममकरंदाला का । माधुरी सुधेची यावी ?
परि मकरंदाची स्तुति त्या । जनतेंत सुधेनें गावी
हें सुभाग्य मकरंदाचें,
परि भव्य सुधासिंधूचें
श्रेष्ठत्व कमि न व्हायाचें;
थोरांचा थोरपणा तो । बहु मान गुणलवा देतो. ॥१॥

आपण मम महती गावी । हा आशिर्वादचि तुमचा,
केला स्तुतिगानालाप । जरि सूर्यानें इंदूचा
परि असणें इंदु सतेज । हा गुण रविकिरणरजांचा,

ठिणगी जरि एक उडाली
चमकली अहा भंवताली
अग्निची सरी तिज कसली?
तिज दिव्य अग्निनें म्हणणें। यांत तिचें सफलचि जगणें. २

कां किरणशलाका पावे । सूर्याची पदवी थोर?
लोहाचें सोनें झालें । परिस न तें परि ठरणार
दर्पणीं बिंब पुष्पाचें । पुष्पसें सत्य नसणार
मी कोण कोठुनी आलों
चरणांशीं तुमच्या भिडलों
साउलींत तुमच्या न्हालों
उजळूनी तिथुनि निघालों । मग कांहिं कांहिं गुणगुणलों ३

ती गुणगुण मम मधुपाची । आज या वाङ्मयोद्यानीं
जरि मंजु मनोहर ठरली । जरि कुणास रमवूं शकली
परि सरस्वतीच्या वीणा—वादनीं काय ती उरली
त्यापरीच माझी कविता;
शिकविली तुम्हीं जी कवि-ता
ती दाखवितों मी जगतां
तें श्रेय आपणा सारें । मी केवळ तुमचें वारें. ४

———

प्रिय मित्रमंडळीकारितां

## संक्रान्तीचा हलवा.

सर्वांच्याच परिस्थितींत घडतीं
स्थित्यंतरें सर्वदा,
प्रेमाच्या मुलुखांत मात्र नसतो
केंव्हांहि हा कायदा,
त्याच्या शाश्वततेस कां मग हवा
संक्रान्तिचा हालवा ?
मी माझ्या रुधिराश्रुचा करिन
तत्प्रीत्यर्थही कालवा.

---

## दैवाचा भेसूर खेळ.

चाल—उद्धवा शांतवन.—

हा सर्व हल्लकल्लोळ
दैवाचा भेसुर खेळ ॥ धृ ॥

ही पूर्वदेवता हंसली । परि उदासीनता वदनीं,
उदयाचळिं भानू आला । परि भयाणता तत्किरणीं,
किलबिलते ही विहगचमू । परि कर्कशता तद्गानीं,
हे सुटती शीतल वारे
परि थरथर देह थरारे
रम्यत्व संपलें सारें
आज कां वस्तुंतिल सकल ?—दैवाचा भेसुर खेळ ॥ १ ॥

हीं फुलें उपवनामाजी । कोमेजुनि गळतीं खालीं,
तुळशिचे वाळले थाके । चालल्या सुकोनी वेली,
ती कारंजाची धारा । बंद जलाभावीं झाली,
हीं फुलपाखरें मेलीं
मधुपावलि कोठें गेली ?
शुष्कता उपवनीं आली
सर्वत्र अवस्था विकल —दैवाचा भेसुर खेळ ॥ २ ॥

वरुणाची झाली वक्र । दृष्टी या देशावरती,
संपलें नद्यांचें पाणी । पात्रीं मग गोटे उरती,
खडखडीत झाल्या वापी । बुडतेहि न केवळ नरटी,
देशांत पिकें मग कुठलीं ?
रयतेची छाती फुटली,
पोटाची चिंता उठली,
हैराण जाहले सकल—दैवाचा भेसुर खेळ ॥ ३ ॥

या अशा विपत्कालांत । आपल्या क्षुद्रशा उटजीं
लावुनी हात नशिबाला । बसलेला दिसला बाजी
रोजचेंच चिंतन होतें । चाललें मस्तकीं आजी
आज काय खाऊं घास ?
परिवार गळ्याला फांस !
काय घालुं आतां पशुंस
हा कसा बसावा मेळ ?—दैवाचा भेसुर खेळ ॥ ४ ॥

गुडघ्यांतुनि काढुनि मान । पाहिलें तयानें पुढती
तों बैल साश्रु-नयनांनीं । फिरफिरुनि त्याकडे बघती
आशाळभूत निज दृष्टी । त्याकडे धेनु लावीती

चरकलें तयाचें हृदय;
"हाय ! हा प्रभू किति अदय !
कां तया म्हणावें सदय !"
वदनांतुनि आले बोल—"दैवाचा भेसुर खेळ" ॥ ५ ॥

जे चार गड्यांना बैल । आवरतां आले नव्हते
हाय ! देह त्यांचे आतां । अस्थिचे सांपळे होते
ते कांतिहीन बहु दीन । पाहुनि मन न कसें द्रवतें ?
जडपदें जाउनी जवळीं
चुंबिली आपली गोळी
बैसुनी खालती ढाळी
अश्रूंची मोहनमाळ—दैवाचा भेसुर खेळ ॥ ६ ॥

संकल्प करुनि मनिं कसला । आणिलें बाहुनी लोक
ठरवुनी आंकडे रुपये । घेतले मोजुनी रोख
गोठ्यांतुनि गेले बैल —छे, प्राणप्रिय ते तोक
पातली भयंकर विपदा
अप्रिय तरि केला सवदा
त्यांत करी गुजराण तदा
झाली मग चालू चूल—दैवाचा भेसुर खेळ ॥ ७ ॥

दुष्काळ पातला घोर । अन्नान्न दशा गरिबांची,
आजच्याहुनी दिन पुढचा । पायरीच परमावधिची,
एक वेळ एकच घांस । एकवेळ उपवासाची,
चोंहिकडे हाहाकार
जाहले लोक बेकार
जाति सोडुनी घरदार
जड होइ पोटचें बाळ—दैवाचा भेसुर खेळ ॥ ८ ॥

बाजीची गौळी उरली । सकळ मालमत्ता सरली
शेवटीं तिच्या विक्रीची । कठिण महा घटिका ठरली
' ही विकूं कां नको ' ऐशी । बाजीची मति बावरली
पोटाला भांतुनि चिमटा
मग करुनी हिय्या मोठा
मोकळा करी तो गोठा
माध्यान्ह कठिण हा काळ !—दैवाचा भेसुर खेळ ॥९॥

एकदां घेतला पैका । फेंकिला परत जोरानें,
मारुनी मिठी गौळीला । चुंबिलें तिला प्रेमानें,
' लागली भूक मज बाबा ! ' म्हणतांच तोंच पोरानें
हृदयास बैसला धक्का,
स्वीकारुनि सगळा पैका
आवरिलें भपुल्या शोका;
बोले तो " दावें खोल;-दैवाचा भेसुर खेळ" ॥ १० ॥

" लाडके माउली गौळी ! मुरडुनी नको पाहूंस,
जा खुशाल त्याच्या संगें, हीं ढिपें नको गाळूंस,
घातला आजपावेतों । काढुनी तोंडचा घास,
घांसतो भाज मी टाचा,
मग तुला घास तो साचा
कोठुनि गे ? भाणायाचा
कोपला कृष्ण घननीळ-दैवाचा भेसुर खेळ " ॥ ११ ॥

बाजीस सुचेना कांहीं । मस्तकीं घाव जणुं पडती
अन्नास रुची लागेना । हृदयाचे तुकडे तुटती
हुरहूर लागली मोठी । गौळीची जातां मूर्ति

मन धांव तिजकडे घेई
तिजविना दिसेना कांहीं
परि उपाय कांहीं नाहीं
लागलें तिचें जणु खूळ—दैवाचा भेसुर खेळ ॥ १२ ॥

उगवली उषा त्या पुढची । दारांत दिसे तों गौळी,
त्यापुढती लागोपाठ । त्यापरी चारदां आली,
परि खालावत गेलेली । तनु तिची हाय ! भाढळली,
उगवला पांचवा दिवस
फिरुनि ती उभी दारास,
बाजीनें पाहुनि तीस
गोंजारुनि दिधला कवळ;—दैवाचा भेसुर खेळ ॥१३॥

तों नवीन मालक आला । बांधिलें गळ्याला दावें,
फोडिला तिनें हंबरडा । विच्छिन्न हृदयही व्हावें,
निज देह उपाशीं तेथें । टाकुनी प्राण सोडावे.
हे तिथें पाहती सकल
त्या प्रेमळ पशुचें नवल;
परि बाजी शोकाकूल
ढळढळा रडे तिजजवळ;—दैवाचा भेसुर खेळ ॥१४॥

बाजीस लागलें वेड । त्यापासुनि मग गौळीचें,
'ये गौळी, गौळी' म्हणुनी । बेभान अंगणीं नाचे,
'कां पिकांत जाशी ? हैक !' बडबडे यापरी वाचे,
लागली झुंज रस्त्यांत
'हैक, हैक' ऐसें म्हणत
घुसलाच एकदां त्यांत
गौळीचा पाळनवाला गौळीस्तव ऐसा मेला ! ॥१५॥

———

# हे हनुमंता !

चालः—धन्य शिवाजी०—

औटहात हा बंदीखाना सोडुनि गेलांत
औट घटींचें राज्य चालवुनि मुक्त जाहलांत
कां हो सखया ! या निज हृदया विसरुनि गेलांत ?
स्वकीयशून्या स्वर्गश्रीला कैसे भुललांत ?
क्षमस्व भूपा ! या संतापा कैसा आवरुं मी ?
म्हणुनी अनुचित आरोपांच्या निघती वचनोर्मी ॥

किती जणांनीं दीर्घ उसासे तुझ्या उशापाशीं
सोडियले; परि विफल जाहले मृत्यूच्या पाशीं;
किती जणांनीं अश्रु गाळिले कलेवरीं तुझिया
दया न आली परि त्या काळीं यमदूता अदया;
काय उसासे परत फिरविती मृत्यूचे माले ?
सरूप-सद्गुण थोपविती कां काळाचे घाले ? ॥१॥

सहृया, जिवलगा ! हे हनुमंता ! जीव होइ गोळा,
असाल कोठें या ब्रह्मांडीं बोला हो बोला !
दडाल कां हो समाधिच्या या दगडा मातींत ?
मम हृदिं राहुनि चिरंजीव व्हा हे नयनातीत !
मृत्युलेख जे, दुःख लेप जे शाश्वत झळझळित
दिसतिल तेथें कोरियलेले रक्तामांसांत ॥

हृदय विराजित तूं, मग पूजन षोडशोपचारें
कशास तेथें लोकांतिल तें प्रदर्शनचि सारें ?

कशास भक्तिप्रीतिद्योतक या रीती साऱ्या
प्रीतिभक्तिदेवताच हृदयीं ढाळितात चवऱ्या;
नैवेद्याचा निरंजनाचा व्यर्थ पसारा कां
उगीच मांडूं ? गरज तयांची तुला न तेजार्का ! ॥२॥

तव आप्तांच्या अश्रूंच्या या सरिता आटतिल
शोक–दुःख–वेदनांस माझ्या सरी न येईल
तुझ्या पित्याचे पुशील अश्रू तव बंधू सान
तुझियावांचुन कोण टाकितां अश्रू मम पुसुन ?
ताप काय वदुं माझा ? भूमी जळेल अश्रूंनीं
नको नको हे अश्रुविमोचन घेतों आंवरुनी !

असेल माता तरीच सार्थक कांहीं रुसण्याचें
पुसेल कोणी प्रेमें तरि त्या सार्थक अश्रूंचें.
दुर्भागी मी; हाय ! रम्य मम सुकलें राजीव
हळहळतो हा उसंत संतत एकाकी जीव !
करिल कोणि का सांत्वन माझें ? नकोच सांत्वन तें,
या गीताचें सुखमय दुःखचि मजला प्रिय गमतें ॥३॥

# कृष्णाकुमारीचा आत्मयज्ञ.

राजस्तानच्या इतिहासांतील ट्रॅजेडी. मेवाडचा राणा भीमसिंह याची लावण्यवती कन्या कृष्णाकुमारी हिच्या प्राप्तीसाठीं राजस्तानांत तंटे उद्भवून मेवाडवर आपात्ति गुदरणार असें दिसतांच तिलाच जगांतून नष्ट करण्यासाठीं जे उपाय करण्यांत आले त्यांपैकीं शेवटचा म्हणून तिच्या हातांत कुसुंब्याचा प्याला प्राशन करण्याकरितां दिला असतां तिच्या आईनें रडून रडून आकाशपाताळ एक केलें. त्या प्रसंगीं कृष्णाकुमारी आपल्या आईची समजूत पुढीलप्रमाणें घालीत होतीः—

[ शार्दूलविक्रीडित ]

आई का तुजला असे उचित हा आकांत येणेंपरी
अश्रू कां नयनांतुनी स्रवति हे ? झालीस कां बावरी ? ।
शोकानें तुझिया मदीय ढळुनी जाईल शांती अतां
आनंदांत अनंत अंत्य घटिका ही घालवो त्वत्सुता ॥ १ ॥

माझी देहलता तुम्ही उभयतां प्रेमांबुनें पोशिली
सौख्याची मजपासुनी न मिळते आजी परी साउली ।
ऐशी मी दुहिता कशास जगतीं ? देहा न कां अर्पुन
साधावें पितृ-राज्य-सौख्य-बिरुद-प्राणादि-संरक्षण ॥ २ ॥

सौंदर्यासह होइ या शरिरिं जों मत्कांति वृद्धिंगत
तों तों जास्त मनीं पिता प्रतिदिनीं चिंताज्वरें भाजत ।
हा मत्प्राण–विनाश आज करुनी घेत्यें न मी माउली
ह्या माझ्या विषसेवनें जळ पडे त्याच्याच चितानलीं ॥ ३ ॥

व्हावें पुष्प सुरम्य जेविं लतिकानाशाप्रती कारण
तैसा ओढवला प्रसंग बघ हा वंशावरी दारुण ।

१९८८

जैसा रम्य समूळ कंद उपटी अंभोजमोहें करी
तैसी ओढवते विपत्ति जननी मेवाड-नाथावरी ॥ ४ ॥

माझी सुंदरताच सर्व जगता झाली मनोमोहक
ती ही मोहकता परंतु ठरते वंशास या दाहक ।
झाली जी विषयी जनांत कलह प्रेरावया कारण
ती मी नष्ट जगांमधून करतां कां हें असें रोदन ॥ ५ ॥

श्वानांची गुरगूर मांस—शकला चाले जशीं देखता
धांवे वायसपंक्ति पिंड सहजीं येतांच दृष्टीपथा ।
मुंग्यांची मधुबिंदु भोंवति जमे दाटी त्वरें ज्यापरी
माझा लोभ धरून चाल करिती भूपाल राष्ट्रावरी ॥ ६ ॥

सारासारविचारशक्ति अवघी एकीकडे सारुनी
आई ! ह्या समरोन्मुखा नृपचमू आल्या पहा क्षोभुनी ।
माते हे नच लोकपाल गमती, हे लोककाळासम
तर्के भ्रष्टवितात, होइ न तया कामी-मनःसंयम ॥ ७ ॥

येई जय्यत मानसिंह इकडे हा मारवाडाधिप,
तैसा हा जयपूर-भूपति जगत्सिंह प्रतापातप,
प्रेताचे रचुनी हिमालय रणीं काढावया ठाकले
याला कारण हाय ! मीच नच कां हे माय शोकाकुले ! ॥८॥

कोणाची तरि राज्ञि होइन पुढें संग्राम झाल्यावरी
त्यापूर्वी विधवा कितीक अबला होतील आई परी; ।
होतें यापरि मी स्वदेशभगिनी-सौभाग्य-संहारक
त्यापेक्षां मरुनी न कां चुकवुं तो आकांत सार्वत्रिक ॥ ९ ॥

स्वार्थी, दुर्मद, कामलोलुप महा आहे जयाचें मन
त्याची मी ललना म्हणून जगणें मातें गमे लांछन ।

[ अनुष्टुप. ]

लेखणी थांबली येथें, जाहली स्तब्ध मन्मती,
स्वातंत्र्य केधवा देवा ! नांदेल चिर भारतीं ॥२३॥

---

# हे प्रतिमे !

पतिप्रतिमेसन्निध असलेली स्वतःची प्रतिमा पाहून
एका विधवेस सुचलेले विचार.

---

चालः—अजि अकुर हा०—

हे प्रतिमे ! तूं कपटी किति तरि अससी ?
सवतीसम गमसी मजसी;
तें कारण मी काय दावुं तुज वदुनी
बघ स्वतःस येइल कळुनी.
मज लोटुनियां वैधव्य—ज्वलनांत
मिरविसि तूं सौभाग्यांत
हें कैंवि मला बघवेल ?
मज धीर कसा धरवेल ?
करपतसे मम तनु—वेल
मी शमवुं तरी दाहकता ही कैसी ?
सवतीसम गमसी मजसी ॥१॥

मी आठवुनी भूतकाळ सौख्याचा
वर्तमान क्रमिते साचा,
ही नजर जरा भावी काळावरती
लागता बावरे वृत्ती,

मज भिववितसें भूत भाविकाळाचें
कीं माझ्या दुर्दैवाचें
त्या जवळ करुनि मूर्तीस
तूं कायमची बसलीस
मग धरशिल का भीतीस ?
मज वाटे तव हेवा बघतां तुजसी;
सवतीसम गमसी मजसी ॥२॥

मी मंचकिं या पडुनि तुजकडे बघतें
कंटाळुन झोंपीं जातें,
तों स्वप्न पडे अनुपम सौख्याशेचें
वर्णु तरी तें मी कैचें ?
मनमोहक ती मूर्ति तिकडची पुढती
धरुनी मज आपुल्या हातीं
कांहिं तरी कानीं वदणें,
मज करि तें लाजिरवाणें
परि अधीर तेणें होणें;
परि स्वप्नाचा होता पडदा दूर
लागतसे अति हुरहूर ॥३॥

मी असतांना स्वप्नाच्या सृष्टींत
मज मोद कल्पनातीत,
तुज गणिलें मीं हीन दीन दुर्दैवी
कारण चैतन्याभावीं,
त्या स्वप्नाची जातां आतां भूल
होत्यें मी शोकाकूल,

हिणवतेस मजला काय ?
बघवे न तुजकडे हाय !
हें तिळतिळ तुटतें हृदय,
ह्यापुढति भतां नलगे बघणें तुजसी
सवतीसम गमसी मजसी ॥४॥

जरि ह्मणतें हें, परि मन तिकडे वळतें,
दृष्टीही नकळत पळते,
त्वत्सन्निध ते कोण बैसले राव ?—
छे, तीच सुखाची नाव,
तूं ठेवियला स्कंधिं कुणाच्या हात ?
ते माझे प्रियकर नाथ !
मज पाहुनि साधी भोळी
ही मूर्ति तुवां चोरियली
तव ओळख आतां पटली
हे दुष्टे ! तूं स्वार्थी अतिशय अससी,
सवतीसम गमसी मजसी ॥५॥

* * *

छे ! व्यर्थ तुला तीव्र दूषणें दियलीं
मी असुनि अभागी मेली !
जरि पुसला हा माझा कुंकुमतिलक
परि नको तुला हें दुःख
तूं रहा सदा त्यांच्या प्रिय सहवासीं
तें सुखद गमेलहि मजसी,

तुजकडे सदोदित बघुन
मी भाविकाळ कंठीन
तूं धीर मला देऊन
मी शोकानें जातां भांबावून
मज सखये ! धर सांवरुन ॥६॥

---

# देहाचा पूल.

प्रसंग—श्री शिवाजी महाराजानीं तोरणा किल्ला घेतल्यावर त्याच्या पारिपत्याकरितां विजापुराहून आलेल्या दुय्यम प्रतीच्या सरदाराशीं झालेल्या चकमकीपूर्वी ज्या चार मावळ्यांनीं आपले देह खरखीत निखाऱ्यावर कोटून पूल तयार केला त्यानांच ही कविता समर्पण असो !

चालः—उद्धवा शांतवन कर जा०-

पूर्वींच्या इतिहासाचें । उलटतां पान एकादें
फुरफुरति आमुचे बाहू । जरि गुलाम झालों बंदे,
समशेर मुठींत न आज । लेखणिचे करितों धंदे
जी नसानसांतुनि बिजली
तेधवां सदा सळसळली
हतवीर्य आज ती झाली
म्हणुनि हें जिणें श्वानाचें । कीं देणें हें नशिबाचें ॥१॥

'हें नशिब आमुचें' म्हणुनी । वीरांच्या वदति न वाचा,
ते स्वतःच्याच रुधिरानें । लिहिति लेख निज नशिबाचा,
सौभाग्यसाधनीं देती । मोबदला ते जीवाचा,

ते स्वदेश कल्याणार्थ
लाथाडुनि देती स्वार्थ
मानुनी समर शुचितीर्थ
शौर्याची करिती शर्थ । जणुं कुरुक्षेत्रि तो पार्थ ॥२॥

पार्थाचे सुटती बाण । त्यापरि हे धांवति कोण ?
त्यांचिया रोमरोमांत । संचरलें कसलें स्फुरण ?
घनघोरहि काळोखांत । दिसतात जे चकाकून
ते बच्चे नच भ्याडांचे
ते मरगट्टे हाडाचे
ते भोक्ते स्वातंत्र्याचे
सह्यगिरी कुहरांतिल ते । छावे जणुं शार्दूलांचे ॥३॥

'उचलून विडा दरबारीं । सरदार विजापुरवाला
पुनवडीवरी[1] चालून । यावयास शीघ्र निघाला,
पातला शिवापुरिं;' ऐसें । जासूद वदे शिवबाला;
वृत्त हें ऐकिती कान,
लागलें शिवापुरिं भान,
तो वळवि आपुली मान
तों उभे राहिले भाले । रिपु-रक्तास्तव तान्हेले ॥४॥

जय भवानिचा गर्जोनी । धांवले शिवाजी राजे
घेउनी जिवाचे दोस्त । तीनशें मावळे सर्जे
ते किरण तयाचे दिव्य । तो सहस्राकरसा साजे
स्थापक ते स्वातंत्र्याचे,
तारक ते जरिपटक्याचे,
चालक ते शिवशाहीचे,
गोपाळ ते मुकुंदाचे । ते वानर हनुमंताचे ॥५॥

---

१ पुणें.

पातले छावणीजवळी । ते काळ कांबळीवाले,
खानाचा चक्काचूर । आतूर कराया झाले,
पेटल्या निखाऱ्यांनीं तों । खंदक ते रसरसलेले,
पातलें भयंकर कोडें
विजवाया जवळि न ओढे
भिवविति न तयां ते खोडे
कल्पना स्पर्शली चित्ता । जो तोच पटाइत चित्ता ॥६॥
येउनी पुढें सकलांच्या । जाहला शिवाजी वदतां—
' जाणार काय माघारी '?—' सरकार काय हें पुसतां '?
' ऐका तर माझें आतां '—' जी तयार हुकुमाकरितां '
खंदकावरी झणिं कोण
आपुले देह टाकून
मज देइल पूल करून ?'
निघतांच शब्द बाहेर । निजले त्यावरि जन चार ॥७॥
त्यांच्या त्या देहावरुनी । वीर आंत सगळे घुसले,
कंठनाळ रिपुचे चिरिले । रक्ततृषित भाले प्याले,
विजयाच्या त्या दीप्तीनें । उरले ते सारे न्हाले,
इतक्यांत उगवला अरुण,
तो गुलाल उधळी वरुन
आनंदें भास्कर-किरण
दर्शविती स्वातंत्र्याचा । उदयकाल साम्राज्याचा ॥८॥
ती स्वातंत्र्याची गंगा । आज हाय आटुनि गेली,
ते चार मावळे गेले । ती सर्वहि सृष्टी सरली,
परि स्वार्थत्यागाची त्या । ही स्मृतीच केवळ उरली,

---

१ नांव सांपडत नाहीं.
२ या चौघांचीं नांवेंसुद्धां आज अज्ञात असावीत अं !

इतिहास आज आयकितां
वाटेल लाज जरि चित्ता
तरि मनन करावें आतां
कां स्वराज्य तेंव्हां झालें ! कां स्वराज्य सांप्रत नुरलें !

---

## ऐशी कां रुससी ?

'लगीन घाई' । कांहीं कारणानें एक बालिका रुसली, बिचारीची पूस-तपास करायला प्रेमाचें माणुस त्या गजबजलेल्या जगांत उरलेंच नव्हतें. सगळ्या साळकाया म्हाळकाया नटून थटुन मिरवणुकीला चालत्या देखील झाल्या ! अशा-वेळीं तिची समजूत घालण्याचा प्रसंग 'वसुधैव कुटुंबिकं' वृत्तीच्या कवींशिवाय कोणाकडे येणार ?

[ शार्दूलविक्रीडित.]

ऐशी कां रुससी उगाच छकुले हे निर्मले कोमळे !
काढाया रुसवा तुझा न दिसते कोणी इथें थांबले ॥
प्रेमाचें जणुं हें रहस्य रुसणें कीं पुष्प त्यांचें असें,
प्रेमी आप्त जरी नसेल, रुसवा जातो वृथा राजसे ॥ १ ॥

ही संध्या रुसते म्हणुन हंसवी इंदू नभीं येउनी
होता रुष्ठ उषा रवी हंसवितो प्रेमावलोकें क्षणीं
तच्चित्ता खुलवावयास नसता कोणी तसा प्रेमळ
बाळे त्या रुसल्या कधींच नसत्या येणेंपरी निष्फळ ॥ २ ॥

जेंव्हां सृष्टिसती तशीच रुसते ही बोलकी कोकिळा
येतो माधव सृष्टिला खुलवितो गातो पिकाचा गळा;
येथें हे रुसुनी फुगूनि बसले पाषाण माळावरी
त्यांची पूसतपास कोण करतो, निष्प्रेम ते भूवरीं ॥ ३ ॥

बाळे मीहि कधीं कधीं रुसतसे कांहीं मिषें शैशवीं
प्रेमें आळवणी करूनि जननी मातें तदा हांसवी;
आतां ती जननी दिवंगत असे, कोणावरी मी रुसूं ?
तैशी आळवणी करील कुणि का, कैसा तरी मी हंसूं ? ॥४॥

दुर्दैवें मजसारखीच दिससी तूं लाडके पोरकी,
पोटीं प्रेमभरें धरील न कुणी, तूं त्या सुखा पारखी,
जे येथें जमले तुझ्याभंवति हे कोणी सखे सोयरे
त्यांचीया हृदयीं खरा कळवळा यावा कसा तो बरें ? ॥५॥

दे दे सोडुनि तूं म्हणूनि रुसवा, ही रुष्ट चर्या तशी,
जा जा हांस खुशाल, मारुनि उड्या चेंडूंपरी घे उशी,
ऐसें हें रुसणें सवंग न करी, हा बोध घे अंतरीं—
प्रेमाचें जरि मोल येइल कधीं ऐसें रुसावें तरी ॥६॥

---

## "जगदीशा ! आतां धांव."

मी कोण कोठुनी आलों । याची मज जाणिव नाहीं,
हे सखे सोयरे सगळे । सर्वस्व यांत मी पाहीं,
जीवाची जीवित-पात्रीं । स्वार्थास्तव फुटते लाही,
मी गटंगळ्या नित खातों । या संसाराच्या डोहीं,
देहाची फुटकी नाव
जाईल कुठें भरधांव
लागतो न कांहीं ठाव,
धडकते ही घडोघडिला । बघ विपात्तिच्या खडकाला ॥१॥

लावाया शोध सुखाचा । ठेविलें कुठें तें प्रभुनें
हें विमान मम आशेचें । संचरतें अति वेगानें
तें तसेंच भटकत असुनी । मिळतें नच दुर्दैवानें
दुःखाच्या लागति ठेंचा । परि पदोपदीं जोरानें
शक्तीचें गळले पंख,
भक्तीचा केवळ रंक,
मी बसलों मोजित अंक,
जगदीशा ! आतां धांव, । दे तुझिया चरणीं ठाव ॥२॥

---

## प्रभातसमयीं.

साकी.

आकाशाच्या गंगेमाजी काळोखाचे खडक
धुवुनि निघाले, वितळुं लागले, होत चालले फटक;
पांडुरता हळुं अंधाराच्या चढुं लागे आवरणीं
विलासमंदिर लगबग सोडुनि निघे यामिनी रमणी;
पहाट वारा वाहुं लागला झुळझुळ शीतल छान,
किलबिल करुनी सभोंवतालीं जागविती खग रान,
गांवाजवळी वहात खळखळ लहानसा ओहोळ
बोलत होता केव्हांपासुनि 'उठाउठा' हे बोल;
अशा उपायीं सर्व बाजुनी निद्रित सृष्टीमाजी
ओतुं लागला अगम्य कोणी नूतन चैतन्या जी ! ॥१॥

कृषीवलांची वसती सगळी मावळच्या खेडचांत
कांबळ वाकळ टाकुनि उठली झटपट निज कार्यार्थ,

चिमा, सखाई, ठकी, जखाई, तशी सारजा, गोजा,
भाकर कांदा कोंडा मांडा करूं लागल्या ताजा,
उठ परधान्या, ऊठ सुभान्या, ऊठ पठाणा, राजा,
शेतामाजी निघे शेतकरि बैल घेउनी काजा,
पदराखालुन कोणी माता स्तनीं लाविल्या बाळा
पोटासाठीं उठती करुनी दूर पोटचा गोळा,
ओझीं घेउनि नगरा निघती पालेभाज्यांचीं तीं
घरट्यामाजी पिलें निरवुनी असेच पक्षी जाती ॥२॥

घरोघरींच्या सख्या निघूनी जमल्या ओढ्यावरती
मिळुनि निघाल्या जणुं गावांतिल मांगल्याच्या मूर्ती;
शेतकऱ्यांच्या ललकाऱ्यांनीं प्रदेश तो दुमदुमला,
श्रमपरिहारासाठीं युवती लागति मम गायाला,
संसाराचीं साधीं सुंदर सरस वर्णनें ज्यांत
चालत गाती सहजमनोहर गोड गळ्यावर गीत;
वृंदावनिच्या गाती लीला राधा–गोविंदाच्या
प्यार जाहला विषय कोणता ह्याहुनि मतिला त्यांच्या !
कोणी 'गौळण' 'प्रदक्षिणा' कुणि, कोणी 'मुरली' गाती
झप झप पाउल टाकुनि अपुला मार्ग चालूनी जाती ॥३॥

प्रभात देवी जणुं अवतरल्या येथें अवनीवरती
ऋद्धिसुद्धि जणुं आणितात कीं मांगल्याला भरती;
कीं वनलक्ष्मी नगरलक्ष्मिला नजराणा द्यायाला
प्रेमभरानें भेटायाला आळवीत त्या आल्या.

*   *   *

त्या गीतांनीं अखंड जागृत कवि मग जागा झाला
या गीतास्तव हातीं घेई झणीं कुंचला अपुला ॥४॥

[ श्री. नाथ माधवकृत "स्वराज्याचा श्रीगणेशा" या नूतन कादंबरी-वरील बाळ शिवाजीची बेफाम घोड्यावरील प्रतिमा पाहून.]

# वा स्वारा !

टांच मारुनी घोड्याला
घाल गवसणी गगनाला ॥ धृ ॥
परवशतेचीं भिंताडें । जणुं शत्रूंचीं छाताडें
फेंकीसरशीं भाल्याच्या । उडव चिंधड्या क्षणिं त्यांच्या
रक्ताच्या चिळकांड्यांनीं । रुमाल घे मग भिजवोनी
बांध कांठिला,
त्या झेंड्याला
मिरवायाला
टांच मारुनी घोड्याला । घाल गवसणी गगनाला ॥१॥

कोठें बसली स्वतंत्रता । बघ धुंडाळुनि दिक्प्रांता
सह्याद्रीच्या गिरिकुहरीं । असेल ढाळित अश्रुसरीं
तीर्थ अश्रु ते मानूनी । नेत्रांना घे लावूनी
तरीच तुजला
दिसेल सगळा
मार्ग आपुला
टांच मारुनी घोड्याला । घाल गवसणी गगनाला ॥२॥

परवशतेच्या बुरुजांना । प्रचंड साखळदंडांना
( दुर्दैवांचीं हीं दानें ) । फोड तोड बा वेगानें,
तुला मोकळें हें रान । क्षणांत होइल मग जाण,

स्वैर विहारी !
मार भरारी
धर्मसंगरीं—
टांच मारुनी घोड्याला । घाल गवसणी गगनाला ॥३॥

तव घोड्याच्या टापांनीं । धूळ उडूं दे नभांगणीं
बालभानुच्या किरणांची । चढेल लाली त्या साची
धूळ नव्हे ती गुलाल तो । म्हणेल ऐसें जन जो तो,
कीं मेलेले
जागे झाले
आत्मे सगळे
टांच मारुनी घोड्याला । कवळतात कीं गगनाला ॥४॥

सोनेरी रविकिरणांनीं । जाइल रंगुनि धूळ क्षणीं
जरि पटका जणुं करिं धरुनी । तुफान नाचति वीर कुणी
स्वतंत्रतेचे शाहीर । घेउनि आले अवतार
हीच भावना
अंतःकरणा
पटवायाला
टांच मारुनी घोडयाला । घाल गवसणी गगनाला ॥५॥

---

# इंदू !

इंदू, तूं स्वच्छंद वागूं लागलीस कीं, माझी प्रतिभाही स्वैर वागूं लागते, आणि त्या वेळीं अशीं कितीक चंपकसुमनें तुझ्यावर उधळावीशीं वाटतात.

ही कोण येथ करिते बहु रम्य लीला
कीं स्वैरता गमत मूर्तिमतीच बाला;
'ये इंदु इंदु' म्हणती जन सर्व तीस
होऊनि लोलुप तिच्या मधु चुंबनांस. १

चंद्रप्रभा पसरली वदनीं प्रशान्त
तेणें करीत अपुलें अभिधान सार्थ,
किंवा अहा चिमुकली त्रिकसे इथें ही
आनंददा कुमुदिनी—कलिकाच पाहीं. २

घाली मुखीं मंजुळ हास्य नाच
कीं त्या तिच्या बालिश कल्पनाच;
वातें तरंगावलि मंद मंद
जैशी जलीं तें तव सौंदर्यकंद. ३

हास्यध्वनी मधुर ते असतात फारी
तैसेचि होति परि ते मनिं दुःखकारी;
वाटे तिचा जनक कीं हंसलाच काय,
तो आज नंदनवनीं परि हाय ! हाय ! ४

तो आज नंदनवनीं जरि तात हाय !
त्याची गडे तुजसि जाणिव इंदु काय !
जा अंकीं घे जननिच्या सुख शांत झोंप,
ती ना मिळेल घडतां तव बाल्यलोप. ५

## मीलन.

होती एक सरित्तटीं भडकली
 रात्रीं चिता भीषण,
तारा एक तुटून तींत पडली
 पाही कवी लांबुन,
होतें मानवदेहिं हाय ! ठरलें
 अप्राप्य जें मीलन
तें ऐसें घडतां, उदास कविला
 येईल कां धीर न ?

## गुरु-दाक्षिणा.

( वसंततिलक. )

देशांतरास उदरंभरणार्थ गेलों,
कालांतरें परतुनी परि आज आलों, ।
श्रीसाधुदास-चरणां चिर-वंदनीया
धालों मनीं बघुनिया, दृढ वंदुनीया ॥ १॥

ज्यांचें सदा हृदयिं पूजन म्यां करावें
शेजेवरी नयन झांकुनि ज्या स्मरावें ।
पाहावया अमित उत्सुकही असावें
तद्दर्शनें सुख अमोप न का मिळावें ॥ २ ॥

भोगीत हाय ! असतां जरि आपदेतें
ज्यांची स्मृतीहि मजला सुखशांति देते ।

ते मूर्ति आज दिसली बहु वासरांनीं,
आलों जनांत जणुं संपुनि वास रानीं ॥ ३ ॥

जी वाहते तुमचिया पदिं काव्य-गंगा
तीचे तुषार मिळतांच मदीय अंगा ।
झालों कृतार्थ सुभगों प्रभुजी ! पुनीत
धालों पुन्हां करुनि मज्जन वाहिनींत ॥ ४ ॥

तारापती चमकतो रविच्या प्रकाशीं
हो तत्प्रदर्शन निशासमयीं विकाशीं; ।
तैसा जरी चमकलों असतांच दूर
मी तेजहीन तुमच्या चरणांसमोर ॥ ५ ॥

माता पिता सुहृद हीं प्रिय तीन नातीं
एकत्र होउनि घडे गुरुची सुमूर्ति ।
मत्पूर्वपुण्य फळुनी मज लाभली ती
तीतें कितीहि नमिलें तरि हो न पूर्ति ॥ ६ ॥

मातें तुम्हीच जगतीं गुरु दक्ष नेते
द्यावें तुम्हास जरि मी गुरु–दक्षिणेतें ।
पूर्वीच मी स्वहृदया पदिं वाहिलेंना ?
ध्या दक्षणा समजुनी मज पाद-लीना ॥ ७ ॥

जों जों मदीय वदनांतुनि येइ बोल,
जी जी घडेल कृति मत्करिं या विलोल ।
तें दिव्य भव्य सगळें तुमच्या प्रभावें
ती दक्षणाच तुमच्या पदिं नम्र भावें ॥ ८ ॥

हे चार बोल चुकले मुकले मुलाचे
( कीं तेज घालुनि तुम्ही दिधल्या डुलांचें। )
अर्पीत साधुनि घडी गुरुपूजनाची
नाहींच फूल परि पाकळि ही फुलाची ॥ ९ ॥

---

भरतवाक्य.

## नको अंत पाहूं देवा !

---

चाल—जरि कोणा श्रीमंताची०—

नको अंत पाहूं देवा ! पुरा वीट आला
दास्यमुक्त सत्वरि करि हा देश तूं दयाळा ! ॥ धृ ॥

जिथें स्वातंत्र्यार्थीं मेले रणीं महावीर,
हाय ! पुत्र त्यांचे आम्ही पंजरिंचे कीर; ।
अवस्थेंत ऐशा आतां कसा धरूं धीर ?
सोड, तोड, दाटुनि बसला फांस हा गळयाला ॥ १ ॥

जिवापाड केलें जतन वतन चाललें तें,
हमालींत मातीमोल जीवित या होतें, ।
हाय ! अम्हां दीन-जनांची दाद कोण घेतें ?
नित्य तोंड दाबुनि मुष्टी सजति मारण्याला ॥ २ ॥

घाल उडी ब्रम्हांडाच्या अगा नायका रे !
धेनुरूपधारी भूमी हंबरे मुरारे !
त्राण तिच्या देहीं नुरलें बघुनि तनु थरारे;
प्राण सर्व नेत्रीं झाला हाय ! पहा गोळा ॥ ३ ॥

छत्रपत्री श्रीशिवराया ! गोब्राम्हणपाळा !
महाराष्ट्र कळिजा प्यारा असुनिया तुम्हांला
काय स्वर्गसौख्यामाजी विसरला तयाला
थोर पुण्याईचा तुमच्या नाश काय झाला ? ॥ ४ ॥

समरगाजि बाजी आजी घोडखिंडिमाजी
निजे काय देशाची या जात असुनि बाजी ? ।
पर्वणींत येइ न कशि या हुरूप तया ताजी ?
चढो चेतना वा तेथिल कडेकपारिला ॥ ५ ॥

शिवाजिचा उजवा हात शयन करी काय ?
ऊठ ऊठ उमरावा बा ! बोलविते माय, ।
तिला स्वामिनीला आला दासिपणा हाय !
वेडानि ये यशवंतीला—निज अर्धांगीला ॥ ६ ॥

हाय ! हाय ! परवा गेला, बाळ तिलक गेला !
महाराष्ट्र त्याच्यामागें पोरका जहाला
दिव्य तपश्चर्या त्याची जागवो जनांला
प्राण मिळो चौपाटीच्या सिकत—कणकणाला ॥
नको अंत पाहूं देवा पुरा वीट आला ॥

REFBK-0001987
REFBK-0001987
ग्रं. क्र. ९८०

# अभिप्राय.